ग्रं. सं. ठाणें
काव्य.
८२९.
न ९१८२९
REFBK-0001980

माधव...

संशोधक व ...
...

REFBK-0001980



( From a contemporary painting )
महाराज महादजी शिंदे उर्फ पाटीलबाबा, आलीजा बहादर.

The Gwalior Historical Research Series I.

# राजकवि महाराज महादजी शिंदे

उर्फ

# पाटीलबाबा आलीजाबहादुर

कृत

# कविता.

संशोधक व संपादक
भास्कर रामचंद्र भालेराव
'कविदास'
उबारीदार, सोयत ( माळवा ).

प्रस्तावना-लेखक.
रावबहादुर राव्जी जनार्दन भिडे, बी. ए.,
मुंतजिम बहादुर.

सन १९२१

PRINTED BY Y. T. MANGAOKAR AT THE ALIJAH DARBAR PRESS
GWALIOR, AND PUBLISHED BY BHASKER RAMCHANDRA
BHALERAO, GWALIOR.



श्रीमंत के. मा. सख्याराजा साहेब उर्फ जीजा महाराजा साहेब शिंदे, सी. आय.

॥ श्री ॥

# अर्पणपत्र.

---

कैलासवासी, गंगाजलनिर्मल, परमपूज्य राजमातोश्री
श्रीमंत सख्याराजा साहेब उर्फ जीजा महाराजा साहेब शिंदे
ह्यांच्या पवित्र आत्म्यास
त्यांच्या आंगच्या धर्मप्रियता, अपूर्व दातृत्व, कुलाभिमान,
स्वजनहितार्थ कळकळ इत्यादि अगणित गुणांच्या स्मृत्यर्थ
त्यांचे परमप्रिय पुत्र, शिंदे कुलदीपक
श्रीमन्महाराज माधवराव साहेब शिंदे, आलीजा बहादर
ह्यांच्या अनुज्ञेनें
त्यांचे महाप्रतापी, राज्यसंस्थापक आणि भगवद्भक्तपूर्वज
राजकवि महाराज महादजी शिंदे उर्फ पाटीलबाबा
ह्यांची
ही अपूर्व कृति सादर अर्पण केली आहे.

श्रीमंतांचा पिढीजाद कृपापात्र,
**भास्कर रामचंद्र भालेराव.**



श्रीमंत महाराज माधवराव साहेब शिंदे, आलीजाह बहादुर, ग्वाल्हेर,

# अनुक्रमणिका.

नं.

१. महाराज महादजी शिंदे आलीजाबहादर (चित्र.)

२. श्रीमंत मं.भा. सवाईराजा साहेब शिंदे, सी. आय. ई. (चित्र)

३. अर्पणपत्र

४. श्रीमंत माधवराव महाराज साहेब शिंदे, आलीजाहबहादर, ग्वाल्हेर (चित्र).

५. परिचय

६. पाटीलबाबांच्या कवितेचें स्वरूप

लेखकः—रा. ब. भिडे साहेब.

७. माधवविलास उर्फ पाटीलबाबांची कविता ....

( मराठी. )

१. गुरुस्तुति .... .... १

२. अध्यात्मपर पदें .... .... २७

३. श्रीकृष्णजन्म .... .... ६७

४. गोपालकाला .... .... ७९

५. ललित .... ....१०९

( हिन्दी. )

१. गुरु स्तुति .... ....१११

२. स्फुट कविता .... ....११४

३. श्रीकृष्ण जन्म .... ....१२६

काव्य ६०८
२१ पो.

# परिचय.

---

ग्वाल्हेर राज्याचे संस्थापक व उत्तर मराठेशाहीचे एक आधारस्तंभ आलीजा बहादर महादजी शिंदे हे केवळ मुत्सद्दी अगर लढवय्येच नसून महान भगवद्भक्त व प्रतिभासंपन्न कविही होते, हें वाक्य वाचून कदाचित् आमच्या वाचकांस आश्चर्य वाटेल. जगाच्या इतिहासांत हिंदुस्थानाच्या इतिहासाचें जितकें महत्व आहे किंबहुना तितकेंच महत्व अठराव्या शतकांतील हिंदुस्थानाच्या इतिहासांत शिंदे घराण्याच्या इतिहासाचे अगर महादजीच्या चरित्राचें होय. या दृष्टीनें पाहतां पाटीलबाबासारख्या अद्वितीय पुरुषानें आपली कंबर कसून रणांगण अगर मुत्सद्दी दरबारांत आपला वचक बसवावा व सारस्वतोद्यानांतही निर्भीडपणें क्रीडा करण्यास उद्युक्त होऊन आपल्या अतुलनीय कृतीनें सरस्वतीदेवीस काव्यालंकारानें नटवावें ही गोष्ट प्रसिद्ध महाराष्ट्र कविवर्य मोरोपंतांच्या उक्तिप्रमाणें--**'झाले बहु होतिल बहु, आहेतहि बहु परंतु या सम हा!'** पाटीलबावांची श्रेष्ठता दाखवावयास पुरे आहे. पाटीलबाबांच्या चरित्राचें व काव्याचें स्वरूप याजबद्दल सन्माननीय प्रस्तावनालेखक रावबहादुर रावजी जनार्दन भिडे साहेबांनीं यथायोग्य पर्यालोचन केलेंच आहे, तरी मी तत्संबंधीच्या भानगडींत न पडतां या अल्प परिचयांत संशोधनपरिचयासंबंधीच दोन शब्द लिहिणार आहे. असो.

महादजी शिंदे कवि होते याजबद्दल आम्हांस २।३ ऐतिहासिक पुस्तकांत कांहीं दंतकथा वाचावयास सांपडल्या. त्यांपैकीं प्रसिद्ध महाराष्ट्र-इतिहास-संशोधक रावबहादुर पारसनीस यांनी कित्येक वर्षां-पूर्वीं सुरू केलेल्या व हल्लीं बंद पडलेल्या 'भारतवर्ष' नामक इतिहास संशोधनात्मक मासिक पुस्तकाच्या जून १८९९ (वर्ष २ रें अंक ३रा) च्या अंकांत दंतकथा ऊर्फ जुन्या ऐतिहासिक गोष्टींपैकीं एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे ती अशी :—

"(१६) **महादजी शिंदा आणि मल्लाप्पा वासकर**—महादजी शिंदा हा जसा नामांकित शूर व मुत्सद्दी होता तसाच तो थोर स्वाभिमानी व धर्मनिष्ठ पुरुष होता. त्याच्याच वेळीं वारकरी पंथांतील विख्यात भक्त मल्लाप्पा वासकर म्हणून एक लिंगायत वाणी होता. कोणे एकेवेळीं महादजी पंढरपुरास आला असतां मल्लाप्पाच्या दर्शनास गेला. महादजीस विद्येचाही बराच संस्कार होता. त्यानें पुष्कळ अभंग केले होते व भगवद्गीतेवर 'माधवदासी' या नांवाची ओवीबद्ध टीका थोडक्यांत केली होती. ती दोन्हीं पुस्तकें त्यानें मल्लाप्पाच्या पुढें ठेविलीं व आपण हीं एकदां अवलोकनांत आणावीं अशी त्यास विनंति केली. तुकारामाचे अभंग व ज्ञानेश्वरीसारखी भगवद्गीतेची रसाळ टीका वाचणाऱ्या त्या भाविक वारकऱ्यानें महादजीच्या देखतच त्याची कविता वाचली. तों अभंगांत तुकारामाचीं वाक्यें जशीच्या तशीच उतरून घेतलेलीं त्यास आढळलीं, तेव्हां 'उष्टया पत्रावळी करोनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची' ही तुकारामाची कविता म्हणून त्या स्पष्ट-

चत्या पुरुषानें त्याची टीका केली व माधवदासींतील कित्येक ओव्या वाचून हंसून म्हणाला कीं ही दासी खरीच, ज्ञानेश्वरीसारखी आई नव्हे वगैरे.' तसेंच श्रीयुत राजाध्यक्ष कृत 'जिवबादादाबक्षीचे चरित्रांत' (पृ. १०४) लिहिलें आहे कीं महादजीनें आपली कविता सोहिरोबा आंबिये यांस दाखविली. तेव्हा ते म्हणाले, 'ही कविता आहे खरी पण प्रासादिक नाहीं.' रा. ज. र. आजगांवकर कृत महाराष्ट्रकविचरित्र भाग १ला पृ. ३८३-८५ व रा. पै संपादित '**संतसोहिरोबानाथ**' त्रैमासिकांतही वरील घटनेचाच उल्लेख आहे. असो. रा. राजाध्यक्षांनी तर महादजीच्या कवित्वाबद्दलचें लिहून त्यांचे '**तुम्ही चला चला नंदगृहा प्रति चलारे**' हें पदही आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध केलें आहे व ही कविता प्रस्तुत पुस्तकांतही वाचकांस आढळून येईल. वरील दंतकथेंत मात्र कांहींच तथ्य नाहीं, कारण त्यांत महादजीची कविता प्रासादिक नाहीं असा उल्लेख आहे. परन्तु महादजीची काव्यप्रतिभा, अर्थगांभीर्य, अनुप्रासबद्ध रचना व प्रासादिकता इत्यादि गुण वाचकांस प्रस्तुत ग्रंथावरून कळून येतील. सदर दोन्ही गोष्टी तर आम्हीं महादजीच्या कवित्वासंबंधाच्या पुराव्यांत येथें उतरून घेतल्या आहेत. महादजीबाबा फार भाविक असत. नित्य टिळामुद्रा लावणें, हातांत स्मरणी राखणें व कृष्ण भजनांत तल्लीन असणें याबद्दलचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत आढळतो. वानवळे सावकाराची वरात पैठण येथील 'विष्णुयागा' कडे खर्च केल्याची त्यांची आख्यायिका प्रसिद्धच आहे. संतकवींचे तर त्यांना फारच वेड असें. मल्लाप्पा वासकर, सोहिरोबा आंबिये, रामदासी लक्ष्मण महाराज शिरगांवकर, पैठण येथील नाथमहाराज इत्यादिकांच्या दर्शनानें व संगतींत ते परमार्थ साधन करीत. श्रीमंसूरशहा बीडकर या यवन

साधूस त्यांनी आपलें गुरु केलें होते. संतकवि दत्तनाथ राक्षसभुवन-करांस तर ते रणांगणावरही समागमेच ठेवीत, व पत्थरगडाच्या लढाईतून जिंकून आणलेली ढोल वगैरे वाद्यें नाथांच्या उज्जनी येथील मठांत अद्याप दाखवितात. सविता, पद्माकर वगैरे हिंदी कवींनींही त्यांजवर कवनें केलीं आहेत. तेव्हां अशा सत्संगतींत राहिलेल्या महादजींच्या कवितेंत प्रासादिकता नसल्याचा आरोप ठेवणें धाष्टर्याचे होय. असो.

ग्वाल्हेर येथें प्रस्तुत लेखकानें इतिहाससंशोधनाचें कार्य आरंभिल्या-नंतर यास येथील कित्येक जुन्या मठांतील ग्रंथ तपासावे लागले. तेव्हां श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे शिष्य कल्याणस्वामींचे जेष्ठ बंधु दत्तात्रयस्वामी यांचे वंशजांचा अर्थात ग्वाल्हेर येथें 'आबा महाराजांचा मठ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मठांतील ग्रंथसंग्रहांत श्री आबा महाराज उर्फ मनोहरबुवांचें आत्मचरित्र अर्थात् आबा महाराजांच्याच प्रेरणेनें त्यांचे सत्पुत्र बाळामहाराजांनीं लिहिलेल्या 'श्रीचरित्रांत' (अंश ५ पृष्ठ ११) महादजींच्या कवित्वाबद्दल खालील उल्लेख सांपडला :—

"माधव (महादजी) महाराजांवर कस्बे जामगांवीं श्रीगोपाल कृष्णांनीं निष्ठाबळें प्रसन्न होऊन स्वप्नीं आज्ञा केली जे मी तुझे घरीं येतो. माझ्या तीन मूर्ती सुवर्णमय ओतवाव्या. ज्या प्रतिमेस शस्त्र न लागता सांग होईल तोच मी असें जाणोन नित्य स्वतः पूजन आणि अष्टमीचा उत्सव प्रसंग जन्मापासून गोपालकाल्यापर्यंत वर्णावा. त्य

प्रमाणें लीला श्रीमद्भागवताचे आधारें चरित्र करीत जावे. असा उत्सव अखंड चालवावा. माझ्या प्रसादें तुला कवित्व स्फूर्ति होईल. अशी आज्ञा होतांच 'माधवविलास' या नामें ग्रंथ करून आमरणांत नेम चालविला. "

असो. वरीलप्रमाणें पाटीलबाबा कवि असल्याबद्दलचे पुरावे मिळाल्यावरून आम्हांस त्यांचे काव्यग्रंथही शोधून काढण्याची उत्कट इच्छा झाली. त्याप्रमाणें प्रथमतः आम्हीं तत्संबंधीं ग्वाल्हेर येथें शोध चालविला व एक दोन ठिकाणीं पाटीलबाबांची कविता असल्याबद्दलचा सुगावाही लागला परंतु ती हस्तगत झाली नाहीं ! उज्जनी येथें पाटीलबाबांचे सहवासांत राहिलेले प्रसिद्ध संतकवि दत्तनाथ राक्षसभुवनकर व त्यांचे आश्रित नरहरिशिष्य महीपती उज्जनीकर यांचे संबंधीं आम्हांस बरीच माहिती दत्तनाथांचे उज्जनी येथील सिंगपुरींतील मठांत मिळाली होती व ती पुणें येथील प्रसिद्ध संस्था भारत इतिहास संशोधक मंडळाच्या १८३७ व १८३८ च्या वार्षिक अहवालांतही प्रसिद्ध झाली आहे. सदर कविद्वयांबद्दल विशेष माहिती एकत्रित करण्याच्या उद्देशानें आम्हीं गेल्या वर्षी उज्जनी येथें गेलों व सदर मठांतील ग्रंथसंपत्ति पाहण्याची सुरुवात केली त्यावेळीं सुदैवानें मठाधिपति ह. भ. प. नारायणबुवांनीं आम्हांस सांगितले कीं महादजी शिंद्याची बरीच कविता त्यांचे संग्रही आहे. व त्या वृद्ध गृहस्थांनीं महादजीचीं कांहीं पदेंही म्हणून दाखविलीं. त्याचवेळीं असेंही कळलें कीं महादजीबाबा दत्तनाथांच्याच संमति व परामर्षानें आपली कविता लिहून काढीत व नंतर कीर्तनांत म्हणत असत. तेव्हां आम्हीं

त्यांच्या संग्रहांत मुख्यत्वें करून महादर्जांची कविता शोधून काढण्याच्याच प्रयत्नास लागलों. व आम्हांस खालीलप्रमाणें एक यादी मिळाली:—

"यादी शके १७३१ चैत्र शुद्ध १५.

| वह्या. | वलकट्या. |
|---|---|
| १ अमृतानुभव. | १ रामजन्म. |
| १ ललित गोपालकाला वही एक. | १ कृष्ण जन्म. |
| १ अवधूत गीता वही एक. | १ गणपती जन्म. |
| १ पाटीलबावांचे पदांची वही. | १ ललिताची. |
| १ जडणीसीची वही. | २ गोपालकाल्याची. |
| १ दशमाचे अभंग. | १ मागण्याची. |
| १ अध्यापनाची वही. | १ पंचपदीची. |
| १ पंचपदीची वही. | १ दिंडीची. |
| १ पंचकरणाची वही. | १ विहिरणीची. |
| १ सिद्धांतसाराची वही. | १ नरसिंहजन्म. |
| १ सिमंतिनी आख्यानाची वही. | १ पत्रिकेची. |
| १ वामनाचे श्लोकाची. | १ पंचकर्णाची. |
| १ एकनाथ चरित्राची वही लष्करी | १ गंगा जन्म. |
| १ सिवदिनबाबाचे पदांची वही. | १ तुकोबा वैकुंठास गेले. |
| १ जुन्या गोपालकाल्याची वही. | १ समाधीची. |
| १ ज्ञानेश्वरीच्या ओव्यांची वही. | ज्ञानेश्वराची आदि. |
| १ नरहरी दर्पणाची वही. | २ योगपटाच्या. |

वह्या.

१ शकुनवंतीची वही.
१ भरण्याची वही.
१ जुनी कातड्याची वही.
१ मनाचे श्लोकाची वही.
१ गुटका समाधीचा.
१ किरकोळ म्हण गुटका.

वळकट्या.

१ बाबा साहेबांचे अभंगाची.
१ हरिपाठाची.
१ दशमाचे अभंगाची.
१ चवऱ्यासी लिंगाची.

२३

पोथ्या.

१ ज्ञानेश्वरी.
१ येकनाथी भागवत.
१ पांडवप्रताप.
१ हरिविजय.
१ भक्तलीलामृत.
१ शिवलीलामृत.
१ सिद्धांतसार.
१ रुक्मिणी स्वयंवर.
१ परमामृत ग्रंथ.
१ भागवत संस्कृत.
१ अश्वमेध.
१ रामविजय.
१ भक्तिविजय,
१ गुरुचरित्र.
१ भक्तिभाव.
१ कथाकल्पतरु.
१ अष्टावक्र ग्रंथ.

याप्रमाणें वरील यादीचा पुरावा मिळाल्यानंतर मठांत महादजींची कविता असल्याबद्दलची खात्री झाली व बरीच दफ्तरें तपासल्यानंतर एक चोपडी मिळाली व त्यांतचमहादजींची कविता असल्या-

बद्दलचें बुवांनीं सांगितलें. सदर चोपडींत आरंभीं कांही फुटकळ पदें असून त्यांत ' माधव ' नांव शेवटील चरणांत असलेलीं कांहीं पदेंहां होतीं व नंतरच्या दहा बारा पानांत बहुतेक माधवकृत कविता होती. वहीच्या शेवटील भागांत मात्र निरनिराळ्या महाराष्ट्र कवींची फुटकळ कविता होती. नंतर त्याच संग्रहांत एक आणखी वही सांपडली त्यांत मुख्यत: गोपालकाल्यासंबंधीं निरनिराळ्या कवींचे वेचें असून त्यांतच माधवकृत पदेंही होतीं. तेव्हां ह. भ. प. नारायणबुवांस सदर वह्या नकला करून घेण्यासाठीं म्हणून देण्याची विनंति केली, परंतु बुवांनीं मठांतील वस्तु हलवितां येत नाहीं असें सांगून निराश केले ! बरें, मठांत बसून नकला करून घ्याव्या म्हणावे तर मी फिरतीवर असल्यामुळें एकाच ठिकाणीं ज्यास्त दिवस राहण्यास सवड नव्हती. शेवटीं बुवांस अनेक प्रकारें विनवण्या करून व आमचे घराण्याचा व त्यांचा जुना संबंध दाखवून तात्पुरते बाड हस्तगत केलें. व जर का बुवा उदार मनानें सदर कविता मला न दाखविते अगर नकला करून घेण्याची परवानगी न देते, तर पाटिलबावा-सारख्या श्रेष्ठ कवीची ही उत्कृष्ट कृति कालाच्या दाढेंतच लपून राहिली असती, असो.

याप्रमाणें कवितासंग्रह मिळाला खरा पण तो महादजीचाच कशा वरून ही एक शंका होतीच. तेव्हां वर उल्लेख केलेल्या जिवबा-दादा बक्षींचे चरित्रांत प्रसिद्ध झालेली एक कविता सदर बुकांत पाहतां ती तंतोतंत जुळली. नंतर ग्वाल्हेर येथें मला कळलें कीं महादजीचे

आश्रित रामकृष्णबुवा हरिदास श्रीगोंदेकर यांचे हल्लींचे वंशज बाळकृष्णबुवाचे संग्रहीं सदर कविता असून ते आपल्या दरखेच्या वहिवाटी अन्वयें राज-कुलस्वामी श्रीगोपालजी पुढें श्रीजन्माष्टमीस लीळा व काल्याचे वेळीं सदर पदेंच म्हणत असतात. तेव्हां मी सदर बुवाकडे धांव घेतली. बुवांनी मला सदर कामीं शाब्दिक सहानुभूति दाखविली व सांगीतलें कीं रावजी भुते नांवाचे गृहस्थाजवळ सदर बाड होतें, परंतु त्यांचे आतां कोणीच वारस नाहीं; पांडोबागोसाव्याजवळही कविता होती परंतु आतां ती मिळणें अशक्य; गंगाधरबुवा गोसाव्याजवळही तो संग्रह होता पण हल्लीं त्याचा वंशज मुका आहे; महादजींनीं 'माधवविलास' ग्रंथ केला तो राजपुस्तकालयांत सांपडेल; माझे जवळ लेखी प्रत नाहीं, तोंडी मात्र सांगेन. तेव्हां मी तोंडी सांगण्याचीच विनंति केली, परंतु तीही योग्य रीतीनें मिळाली नाहीं! पुढें मला ग्वाल्हेर येथील प्रसिद्ध संतकवि बाळकृष्णबुवा राजुरकर महाभारती यांच्या मठाचे संशोधनांत महादजीच्या कवितांचें एक बाड मिळालें व सदर मठाचे अधिपतींनी मला तें दिलें. त्यांत उज्जनी येथील बाडाखेरीज दोन नवीन प्रकरणें सांपडलीं व तीं कृष्णजन्माची मराठी व हिन्दी प्रत होय. हिन्दी कृष्णजन्माचे शेवटीं असाही उल्लेख आहे:—

**" इतिश्री मन्महीमहेंद्र माधवराव सार्वभौम विरचित सौरसेनीभाषायां श्रीकृष्णजन्मोत्सवादि वर्णन परिपूर्ण"**

याप्रमाणें पाटिलबावाकृत कविता संग्रहाचे सशोधनाची हकीकत आहे. पुढें ही सर्व प्रकरणें व्यवस्थित रीतीनें जुळवून आपल्या पूर्वजां-बद्दल पूज्यता व अभिमान बाळगणारे श्रीमंत महाराज माधवराव साहेब शिंदे ग्वाल्हेर सरकारांचे शेवेशीं सादर केलें व श्रीमंतांनीं आपल्या सौजन्यास अनुसरून हा संग्रह प्रसिद्ध करण्याची आज्ञा दिली. त्या प्रमाणें श्रीगणेशोत्सवासाठीं कांहीं निवडक पदेंही छापण्यांत आलीं. नंतर आम्हीं मोठ्या जिज्ञासेनें महादर्जी महाराजांच्या कवितेच्या असल बाडाचा शोध करण्यासाठीं राजपुस्तकसंग्रहालय पाहिलें तों त्यांत, सुदैवानें, फुटकळ कविता व पदें असें शीर्षक असलेली एक वही सांपडली व त्यांत **माधवविलास** ग्रंथाचेंही नांव दिसलें. सदर बाडांत गोपालकाला, जन्मोत्सव मराठी व हिन्दी या खेरीज गुरुस्तुति, अध्यात्मपर पदें, ललित, हिन्दी गुरुस्तुति व इतर स्फुट पदेंही आहेत. बाडाच्या शेवटीं लिहीलें आहे कीं :—

‘ इति श्रीमन्महाराज राजमौलि मुकुटमणि मरीचि मंजरी पिंजरी कृत पादपीठानां श्रीमन्महाराजाधिराज माधवेश सार्वभौमानां गीति प्रबंध कृतौ यदुकुलकुमदविकाश प्रकाशित पराक्रमस्य भगवतो नंदानंदकंदस्य श्रीमन्माधवस्य कृष्णचंद्रस्य जन्मक्रीडादि वर्णनं संपूर्णम् ’

असें लिहून ग्रंथलेखनकालही दिला आहे तो असा :—

‘श्रीमद्विक्रम भूभुजो गत शरत्संवेष्ट वेदाष्ट भू । १८४८ संदयं माधव कृष्ण पंचमि तिथौ, वारे रवेः सूनुजे ॥ श्रीमत्पुष्कर तीर्थराज निकटे श्रीमाधवस्याज्ञया । नाम्ना बालमुकुंद मिश्र इतियेना लेख्यदः पुस्तकं ॥१॥’

तसेंच लेखकानें महादजीच्या कवितेबद्दल सार्टिफिकेटह देऊन टाकले आहे कीं:–

श्रीमन्माधव यादवेंद्र परमप्रीतिप्रदेयं सदा ।
श्रीमन्माधव जन्मकर्मजनित व्याहार संदर्भिता ॥
श्रीमन्माधव सार्वभौम कवन प्रागल्भ्य सद्गुंभिता (?) ।
श्रीमन्माधव सार्वभौमकृतिरित्येषाचिरंराजताम् ॥ १ ॥

तरी सदर बाडच अस्सल समजून हा **माधवविलास** नामक महादजीबावा कृत सर्व कवितासंग्रह प्रसिद्ध करण्यांत येत आहे. वर उल्लेखलेली 'माधवदासी गीता' अगर त्यांची इतर कविता आणखी मिळाल्यास तीही वाचकांस अर्पण करूं, हें लिहावयास नकोच. शिंदे कलांत ३।४ पिढ्यापर्यंत काव्याभिरुचि कशी राहिली, हें दाखविण्यासाठीं 'दौलत वाग्विलास,' 'दौलतेश चरित' महाराज दौलतरावकृत पदें, महाराज दौलतरावांनी लिहविलेला 'मिताक्षरी' ग्रंथ, बाळकृष्णबुवा राजुरकरांचा जनकोजी शिंद्यास केलेला 'नीतिबोध' व महाराज जयाजीरावांस पाठविलेली कविता, शिंदे सरकारचा अप्रतिम 'सरस्वती भंडार' इत्यादिक बाबींचा उल्लेख करूनच तूर्त रजा घेतो. असो.

सदर माधवविलासाची अस्सल प्रत जुनेरीप्रमाणेंच मारवाडी १४×६ लांबी रुंदी कागदावर लिहिली असून अक्षर बालबोध, वळणदार पण सुवाच्य नसलेलें, ठिकठिकाणीं अक्षरें सोडून दिलेलें व एका हिंदुस्थानी पंडितानें नकललेले असल्यानें जरी कांहीं ठिकाणीं मराठी लेखन

आम्हांस शुद्ध करून घ्यावें लागलें आहे तरी संशोधन नियमाप्रमाणें मूळ प्रतिबरहुकूमच हा संग्रह छापण्यांत येत आहे. शिवाय मराठी व हिंदी दोन स्वतंत्र भाग करून मुद्रण कार्मी शक्य तितकी काळजी घेऊनही बरींच अशुद्धें, पुस्तक महाराष्ट्रा बाहेर प्रसिद्ध होत असल्यानें, राहून गेली आहेत, त्यास नाइलाज आहे. असो.

शेवटीं ज्या विद्यारसिक, गुणग्राही व प्राचीनइतिहासाभिमानी ग्वाल्हेर सरकार श्रीमंत माधवराव साहेब शिंदे यांच्या कृपेनें व उदारआश्रयान सदर ग्रंथ प्रसिद्धीस येत आहे, त्यांचेही आभार मानणें आवश्यक होय. श्रीमंतांनीं ही कृति आपले पूज्य मातोश्रीस अर्पण करण्याची परवानगी देऊन प्रस्तुत लेखकास चिरऋणी करून ठेविले आहे. माझे मेहरबान ले. क. पंडित कैलास नारायण साहेब हकसर, बी. ए., सी.-आय. ई. यांनीं माझी ही कृति श्रीमंत सरकारांपुढें ठेविली व छापण्याचें साधन जुळवून दिलें सबब त्यांचे व रावबहादुर भिडे साहेब यांनीं तसदी घेऊन आपल्या अमोल्य प्रस्तावनेनें पुस्तकास अलंकृत केलें व पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याच्या सदिच्छेनें जी मदत केली त्या उपकाराबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार मानण्यांत येत आहेत.

या पुस्तकांत प्रसिद्ध होत असलेलें पाटीलबाबांचें चित्रही अपूर्व होय. लक्ष्मण महाराज रामदासी शिरगांवकरांचा मागे उल्लेख आलाच आहे. सदर बुवांनीं पाटीलबाबा मथुरा मुक्कामीं असतांना त्यांचे सहवासांत कांहीं काळ घालविला होता. त्यावेळींच त्यांनीं महादजीबाबांच्या चित्राचाही संग्रह केला होता. तें चित्र ग्वाल्हेर

येथील मागें उल्लेखिलेल्या त्यांच्या मठांत काळजीपूर्वक राखून ठेविलें आहे व सदर चित्र त्या अस्सल चित्राचीच प्रतिकृति होय. प्रस्तुत चित्र पाटीलबाबांच्या तारुण्यांतलें किंबहुना ऐन उमेदींतलें असून, टिळे मुद्रा नसल्यानें, त्यावेळीं त्यांना भक्तिभावाचा नुकताच ळळा लागत चालला होता, असें वाटते. या चित्रानें 'सोने में सुगंध' या म्हणीची सार्थकता होईल, यांत शंका नाहीं. असो.

सदर ग्रंथ 'ग्वाल्हेर इतिहाससंशोधनमालेचें' प्रथम पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या पुस्तकास योग्य आश्रय मिळाल्यास आमच्या संग्रहांतील असंख्य ऐतिहासिक कागदपत्रांचे खंड व इतर अप्रसिद्ध ऐतिहासिक व सारस्वत प्रकरणेंही याच मालेंत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करूं. जास्त काय ?

**मार्तंड सदन,**
लश्कर, ग्वाल्हेर.
८-४-२१.

नम्र,
**भास्कर रामचंद्र भालेराव.**

ॐ तत्सत्

# राजकवि महादजी शिंदे
उर्फ
# पाटीलबाबा आलीजाह बहादुर कृत कविता.

## गुरुस्तुति.

### १ पद.

आचार्या, मान्य देवा मुनिवर्या ॥ धृ० ॥ ब्रम्हविद्या ब्राम्ही स्थिति साक्षी, स्वयंज्योति तूं प्रकाशक सूर्या ॥ १ ॥ त्रिगुणात्मक सूत्रीं मणि गण सम, ज्ञेय सत्ता मात्रामित वीर्या ॥ २ ॥ पूर्णात्पूर्ण अखंडित विलसे, **माधवि** निज दाता ऐश्वर्या ॥ ३ ॥

### २ अभंग.

गुरुशाळे गेलो, केला नमस्कार । कृपा मजवर, वरद कीजे वो रामा ॥ १ ॥ प्रणव लेखन, केलें श्रीगुरु संगें ॥ माझा मीच अंगें, पूर्ण बीज ॥ २ ॥ सक्षम अक्षरें, लिहिली विश्वपटीं ॥ पाहतां वनदाटी, कोठुनी ठेवी ॥ ३ ॥ क्षर अक्षर दोन्ही, लिहिली

लेखनीं ॥ पिंड ब्रम्हांड दोन्ही, रेखीयली ॥ ४ ॥ तयातांत ज्योती, अखंड झळकती ॥ बिंदुले उमटली, नेणो किती वो रामा ॥ ५ ॥ रक्त श्वेत पीत, लिहिले आकासीं ॥ प्रभा नीलयेसी, पूर्ण दाटे वो रामा ॥ ६ ॥ तेजाचें गुंडाळे, दिसती सर्पाकार ॥ तया परमार, निज असे वो रामा ॥ ७ ॥ मयूरांचीं पिच्छें, दाटोनी पिंजरीं ॥ चंद्र सूर्य वरी, सम दिसे वो रामा ॥ ८ ॥ तेथ लाउनी दृष्टि, निलयातें वोटी ॥ प्रभा पूर्ण दृष्टी, भरुनी ठेली वो रामा ॥ ९ ॥ ऐसें हे लेखन, केलें श्रीगुरु संगें ॥ **माधवें** निज अंगें, निघोट तत्व हो रामा ॥ १० ॥

---

## ३ अभंग.

गुरु वरिष्ट सर्वांहूनी । दृढ माधवाचे मनी ॥ जें का परब्रम्ह साचार । संदीपनाचें सेवी वर ॥ १ ॥ सच्चिदानंद राम पूर्ण । वशिष्ट उपदेशी वोडवी कर्ण ॥२॥ आदिशक्ति जगज्जननी । लीन शिवाचे चरणीं ॥ ३॥ जप तप विरंचिसी । एकाक्षर उपदेशी ॥ ४ ॥ तेंचि श्रीगुरुप्रसादें । फावे **माधवा** स्वानंदें ॥ २ ॥

---

## ४ अभंग.

मज गुरुस्तुति आवडे । तेंचि ब्रम्ह वाडें कोडें ॥ जे कां सांवळे सगुण । निरामय अद्वयपूर्ण ॥ १ ॥ आत्मरूप सच्चिज्ज्योति । सोहं सूत्रें दिधलीं हातीं ॥ २ ॥ तप यज्ञ दानें करितां । जे कां वस्तु न ये हाता ॥ ३ ॥ तेंचि सहज कळे दावी ॥ **माधव** सुखें अनुभवी ॥ ४ ॥

## ५ पद.

श्रीगुरुचें उत्तीर्ण काय व्हावें ॥ ध्रु० ॥ जन्मोजन्मीचे चुकवी फेरे त्यासी आतां काय द्यावे ॥ १ ॥ कर स्पर्शितां मम मूर्ध्नीसी माझे मी निजतत्व स्वभावें ॥ २ ॥ तत्वमसीचा पूर्ण बोध हा माधवि सहज स्वभावें ॥ ३ ॥

## ६ पद.

सद्गुरुराज धणी । मन हें जालें उन्मनी । ॐकार स्मरता हे अवघी राहिली करणी ॥१॥ साधन द्वादसी हे करता लाधली समता । द्वादश आदित्याची सत्ता चिद्रूप हें हातां येईल ॥ २ ॥ मीच निळे पिवळे तेरसी चिद्घन हें सगळे । चतुर्दश भुवनें हेंही पाहतां जालि प्रांजळ ॥ ३ ॥ पूर्णपणेंचि असें माधविं अनुभव हा विलसे । या रिती एकादशी हे करितां पूर्ण ब्रम्ह दिसे पाहतां ॥ ४ ॥

## ७ पद.

स्वस्वरूपीं धाले ते साधु । श्रीगुरुकृपेते वेतूं वाटति प्रवादित लक्षें लक्षा आले ॥ १ ॥ सच्चित्सुख हे पूर्ण बोध ब्रम्ह फळीं फळलें ॥ २ ॥ पूर्णपणें त्या माधविं सहजीं मनें उन्मन जालें ॥ ३ ॥

## ८ ओंवी.

उमेसी उमानाथें । श्रीरामें हेंचि सीते ॥ पार्थासी कृष्णनाथें । उपदेसिले हो रामा ॥ १ ॥ मनूसी विवस्वतें । शुकासी नारद तेथें ॥ याज्ञवल्क्यें जनकातें । पूण केलें ॥ २ ॥ अनामाचे नाम सार । वेद गुह्यें पारात्पर ॥ आब्रम्ह भरुनी सारें । उरले असे ॥ ३ ॥ श्रीगुरु दातार । निजतत्व भांडार ॥ **माधव** मूर्ध्नी ठेउनी कर । कृतार्थ केलें ॥ ४ ॥

## ९ पद.

शरण मी आलों वो । श्रीगुरुच्या पदपंकजा ॥ धृ० ॥ पदपराग सुखमवी ज्योती । भ्रमर तेथ मी जालो वो । सच्चित्सुख मी धालो वो ॥ शरण ॥ १ ॥ कर स्पर्शितां सिखांत मूर्ध्नी वर्णबीजीं रिघालों ॥ **माधवि** ब्रम्हरस प्यालो वो ॥ शरण ॥ २ ॥

## १० पद.

श्रीगुरुच्या पदपंकजा भजावे । काम क्रोध लोभ मद मत्सरा पूर्णबोध सहज त्यजावे ॥ १ ॥ पूर्णात्पूर्ण ब्रम्हबुद्धिसी । गुरुवाक्यीं समान प्रेमें यजावे ॥ २ ॥ पद्मकोषीं जागुनी निजशक्ति । परमामृतें हृत्कमल सजावे ॥ ३ ॥ **माधवि** निजतत्व पाहुनि डोळा । सिखांत मूर्ध्नी श्रीगुरुसी पुजावे ॥ ४ ॥

## ११ पद.

धिग् धिग् संसृति दुःख आतां हें नको गुरुराया । अनन्य भावें शरण मी आलो तुझीया पाया ॥ धृ० ॥ माझे मी न कळोनी योनी चौऱ्यार्शी भोगीं । मातृकुहरिं मलमूत्र दाथरिं पचलो सर्वांगीं ॥ २ ॥ अधोमुखें लोंबतां सोहं सूत्रें रक्षिलें । निजज्योति प्रकाशें माझें पालन त्वां केलें ॥ ३ ॥ बाहेर येतां कोहं श्र्यासें तुजला विसरलों ॥ अहा मायेचा कुंचस्त्रेद हा चटुनिया धालों ॥ ४ ॥ होतां यौवनदशा धन सुतदारादिक लोभें । ऐसे अनेक जन्म झाले न कळुनी निजलाभें ॥ ५ ॥ माझें मजला निजतत्व हें डोळां तूं दावी । तत्वंहंसीबोधें ब्रह्मस्वरूप अनुभवी ॥ ६ ॥ स्वरूप साम्राज्याचें मजवरि छत्र झळकावें । स्वात्म सिंहासन **माधवा** स्वानंद द्यावे ॥ ७ ॥

## १२ पद.

श्रीगुरु मला दाविल दाविलें । जें निजब्रम्ह सनातन अद्वय अव्यय साचे ॥ १ ॥ वरद करें मम मूर्ध्नीसी । स्पर्शुनि माझें मज चोजविलें ॥ २ ॥ माझा मीच्चि सर्व व्यापुनि व्यापक । निजतत्व डोळां आलें ॥ ३ ॥ **माधविं** हें निज स्वात्मसुखाचें परमामृतें रस धाले ॥ ४ ॥

## १३ पद.

श्रीगुरुला काय वा द्यावे । त्याला शरण व्हावें ॥ धृ० ॥ सप्रेमें प्रणिपातें **माधव** विनवित सद्भावें ॥ २ ॥

## १४ पद.

गुरुभजनाविण त्वां काय केलें ॥ नरदेह पाउनि दुर्लभ वस्तु भक्तिविण वय व्यर्थचि गेलें ॥ १ ॥ विषयासक्तपणें गृह दारा माझी मी हें वृथा मानिलें ॥ २ ॥ श्रवणीं मननीं बुद्धि नसे तुझी निगमार्थीं मन नाहीं नेलें ॥ ३ ॥ रामकृष्ण गोविंद पदांबुजिं स्वात्मसुखें मन नाहीं घालें ॥ ४ ॥ श्रीगुरुकृपें माधवें सबाह्य पूर्ण तत्व लक्ष न आले ॥ ५ ॥

## १५ पद.

नवला गे माय, नवला गे माय। श्रीगुरुनें दाविले तें बोलों काय ॥ १ ॥ बोलतां अबोलणिये बोली। सच्चिदानंदें प्रभा ठेली ॥ २ ॥ वर्णव्यक्तिवीण उमटली। आब्रम्ह भरली चित्कला गे माय ॥ ३ ॥ तव मी लवलाहे तत्वतां। गुणसंगें या हो जातां ॥ तैं निर्गुणचि सर्व सत्ता। माझे मीचि वो माय ॥ ४ ॥ माझ मजविण न दिसे दुजें। सद्गुरुकृपेचेनि वोजे ॥ चैतन्यब्रम्ह सहजें। माधव दिसे वो माय ॥ ५ ॥

## १६ पद.

नमिले म्यां श्रीगुरुच्या चरणाला, भवभयहरणाला ॥ धृ० ॥ विषयार्णव दुस्तर जो कां म्हणिजे तारक तरणाला ॥ १ ॥ स्वस्वरूप स्वात्मसुख हा देतो अंतःकरणाला ॥ २ ॥ पूर्णात्पूर्ण ब्रम्हज्योति जगदोद्धरणाला ॥ ३ ॥ श्रीगुरुस्वानंदपूर्णमूर्ति माधव शरणाला ॥ ४ ॥

## १७ पद.

स्वस्वरूपा उमजा, श्रीगुरुलागीं शरण तुम्हीं जा ॥ ध्रु० ॥ पूर्ण ब्रम्ह हे व्यापक सहजीं कोण येथ दूजा ॥ १ ॥ अद्वैतीं हा द्वैत पसारा विकृतिला समजा ॥ २ ॥ ज्योतिर्मय हें माधवि विलसे त्या स्वरूपीं रम जा ॥ ३ ॥

## १८ पद.

श्रीगुरु भवतारी । सच्चित्सुखकारी निजप्रणव विस्तारी ॥ १ ॥ सोहं बोधें तारी, मज केलें निर्विकारी ॥ २ ॥ ब्रम्ह हें न्याहारी, सहजीं माधवा उद्धरी ॥ ३ ॥

## १९ पद.

श्रीगुरु माय माय माझी, निकी घेऊनी बैसली अंकीं ॥ ध्रु० ॥ नवविधेचे नवमासीं, तें जन्मलों स्वरुपासी । सबाह्यस्नानें अद्वयजानुसी, पीतांबर वसनें मज पुसी । प्रणव अक्षरें अक्षरें जे घुटिसी, पान करविलें सावकासीं ॥ वरदकर स्नेह स्नेहें मूर्ध्नीसी, गुह्यमंत्र श्रवण फुंकीं ॥ १ ॥ दिव्यांजन अंजन वालि डोळां, दावी स्वरूप सोहळा । स्वात्म पेहरण पेहरण मज गळां, वाळलेण्याची चित्कळा । लेववि मजला, चिद्दल जडित टिळा । दशविध वाद्यें खुळखुळा, थापटुनि निजवी

चैतन्यपालखां ॥ २ ॥ गुणातीत निर्गुणानिर्गुण निजसूत्र, लाउनी हलवी स्वतंत्र । सर्वदा गाती ते गाती, ब्रम्हमंत्र उन्मनि निद्रा परतंत्र वाढवि । माय हे माय कृपापात्र, तई म्यां उघडितां नेत्र । तेजोमयलेखनें दाविते कीं ॥ ३ ॥ माते क्षुधे व्यापमनें, सत्रावीचे देत स्तन । मी स्वानंदें आनंदें खेळणें, मुक्त मोतिलगजार्‍हानें । कोहं कोयल कोयल फिरवून, सोहं सूत्राची खूण ॥ चक्र दृष्टि **माधव** हें अवलोकीं ॥ ४ ॥

---

## २० पद.

---

संदेहो वृत्तिचा फिटलाहो ॥ धृ० ॥ ब्रम्हरूप ब्रम्हमूर्ति, त्याची जालिया संगती । बैसवि पंगति, मज संतांचिया हो ॥ १ ॥ पद्मकर माथां ठेवी, निजरूप नयनीं दावी । सोहं लक्षं अनुभवी, चित्स्वरूपाहो ॥ २ श्रीसद्गुरुप्रसादें, **माधव** तुष्टला स्वच्छंदें । स्वरूप आनंदें, पाहतसेहो ॥ ३ ॥

---

## २१ पद.

---

गुरुविण नोहे ज्ञान रे, सच्चित्तजजोती आत्माराम ॥ धृ० ॥ मायामृगजळीं व्यर्थचि बुडसी, श्रीगुरु कर्णधार तारी या विषमा ॥ १ ॥ **माधव** मुकुंद केशव हे नौका, स्वानंद-सुखरूप पावसि तूं धामा ॥ २ ॥

## २२ पद.

श्रीगुरु त्राता मज तूं तूं तूं ॥ धृ० ॥ नाना संकटीं जेंवि रक्षिल द्रौपदीभ्राता तूं तूं तूं ॥ १ ॥ संपत्ति जेंवी श्रीहरि देउनी, धृव अवध्राता तूं तूं तूं ॥ २ ॥ **माधवातें** सहाय सदोदित, दुष्ट विद्राता तूं तूं तूं ॥ ३ ॥

## २३ अभंग.

एक गुरु आणि देव। पूर्ववृत्तीसी सद्भाव ॥ धृ० ॥ बुद्धि निश्चयेंसी मन । होय ब्रम्ह सनातन ॥ १ ॥ ऐशी प्रतीतीची खूण । तोचि स्वयें जनार्दन ॥ २ ॥ तेथें द्वैता नाहीं उरी । जाला स्वयंज्योति हरि ॥ ३ ॥ गुरुकृपें निःसीम । **माधव** तोची आत्माराम ॥ ४ ॥

## २४ अभंग.

ध्यावा ध्यावा श्रीगुरुराज । सहज होय स्वात्मकाज-आत्मकाज ॥ धृ० ॥ जो का स्वानंदाभिराम । पूर्णपणें जो निःसीम-निःसीम ॥ १ ॥ तत्वमसीचे भाण्डार । देतो माथां ठेउनि कर-वरदकर ॥ २ ॥ क्षराक्षरादि वंदती । सारुनिया दावी दीप्ति-निजदीप्ति ॥ ३ ॥ जें का नित्य सदोदित । स्वप्रकाश अखंडित-अखंडित ॥ ४ ॥ गुरुकृपें ऐसें फावे । **माधव** स्वानंदें सुखावे-हा सुखावे ॥ ५ ॥

## २५ पद.

कृपा श्रीगुरुची, त्याविण न कळे ब्रम्हरुची ॥ १ ॥ प्रणव बीजें हंसोहं साची, भ्रम मध्यें गति स्वस्वरुपाची ॥ २ ॥ मणिमय तत्वदृष्टि लक्षाची । अपूज्य लिंगें पाहतां शुची ॥ ३ ॥ मुकुलित पुष्पें निजज्योतीचीं । अखंड पूजा चैतन्याची ॥ ४ ॥ मम मूर्ध्नीं स्थिति वरदकराची । माधविं प्राप्ती साम्राज्याची ॥ ५ ॥

## २६ पद.

आम्ही जाणो श्रीगुरु नाम । धर्म न जाणो कर्म न जाणो पाहुनि निजरुप शाम ॥ ध्रु० ॥ आदि परंपरा शंभु सांगे, सीतेसी श्रीराम । एकरथी हे अर्जुन कृष्णें, दाखविलें निजधाम ॥ १ ॥ ज्ञानदेवी श्रीयेका जाला, स्वरूपीं संत आराम । साहेब चरणीं **माधव** जाला, स्वरूप पाहतां निःकाम ॥ २ ॥

## २७ अभंग

अरे अरे श्रीगुरुराया । माझें दंडवत पाया ॥ ध्रु० ॥ पीडियेलो भवसंगें । तुज शरण आलो वेगें ॥ १ ॥ कृपा केली दीनोद्धारा । निजवस्तुच्या माहेरा ॥ २ ॥ निज गुजमंत्र दिला । तण चिदानंद देखिला ॥ ३ ॥ तिस्मृति गाती ज्याला । मूळासहित हातीं दिला ॥ ४ ॥ खंब्रम्ह ऐसी स्थिति । तुझ्या कृपे लाधली हातीं ॥ ५ ॥ वळखी चिदानंदा जाली । म्हणे **माधव** गुरूमाउली ॥ ६ ॥

## २८ अभंग.

धरा धरा श्रीगुरुसंग । जेणें कळेल पांडुरंग ॥ धृ० ॥ चतुर्युगाचा जनिता । दात्री कृतयुगसत्ता ॥ १ ॥ अधमोत्तम भाव नाहीं । लागति एकमेकां पायीं ॥ २ ॥ सर्वां हृदयीं तोचि खेळे । म्हणुनि अहंभाव गळे ॥ ३ ॥ महदादि परात्पर । जो कां निर्गुण निर्विकार ॥ ४ ॥ होतां श्रीगुरुकृपा सांग । **माधव** मानसें श्रीरंग ॥ ५ ॥

## २९ पद.

बरवे ध्यावे सख्या रूप गुरुचें ॥ धृ० ॥ ध्येयध्याताध्यान त्रिपुटी मिळोनी, ब्रम्ह आपणचि स्वभावें सद्भावें । १ । ध्यान धारणा आसन मुद्रा, लक्षालक्षीं पहावे सद्भावें ॥ २ ॥ नित्यानंदें देसी कृपया **माधवि** पूर्ण प्रभावें सद्भावें ॥ ३ ॥

## ३० पद.

भजरे श्रीगुरु आत्मारामा ॥ धृ० ॥ त्यजुनी माया स्वरुपीं रमाया, भवभ्रम सर्वहि राया रामा ॥ १ ॥ हंसज पाया करुनि तपा या, यावया ब्रम्हपदा या ॥ २ ॥ मुक्ति वराया भक्ति कराया, **माधवि** गुणगण गाया रामा ॥ ३ ॥

## ३१ पद.

नवल गे माये श्रीसद्गुरुचे ॥ धृ० ॥ पाहतां पाहणें वडे, ब्रम्ह कीं रोकडे, भासे दृष्टि पुढें, सज्जना उघडे । असज्जना दडे, जडत्वें ना तुडे ॥ १ ॥ द्वैतवाद्यां भुलीं, दर्शनें झकलीं, तापसें विशंकलीं, अभिमानें मुकलीं, वर्णाश्रमयोगें ॥ २ ॥ पूर्णपणें असे, साक्षित्वें जो वसे, सत्ता रूपें दिसे, माधव हा स्वयें ॥ ३ ॥

## ३२ पद.

श्रीगुरुच्य चरणा शरण तूं जाई त्वरें करुनि रे मना ॥ धृ० ॥
श्रीगुरु ब्रम्हा श्रीगुरु विष्णु रे, श्रीगुरु महेश्वर कीं स्मरणा ॥ १ ॥
नारायण माधव हा तोचि रे, ब्रम्ह सनातन तया नमना ॥ २ ॥

## ३३ पद.

गुरुकृपेची वेळा रे ॥ धृ० ॥ चौऱ्यासी लक्ष हे योनी फिरतां, नरदेह पाऊनी ये हे बारे ॥ १ ॥ स्वात्मभावें शरण तूं होतां, लाहसी परब्रम्ह मेळा ॥ २ ॥ मायाधव माधव तूं अंगें, पाहसि सच्चिद खेळा ॥ ३ ॥

## ३४ पद.

सद्गुरुनाथ अनादि सिद्ध, करुणानिधि हे जाणे । तुज ध्यान असे निज मानसीं, जप तप आन करूं नेणे ॥ १ ॥ स्वानुभावें कृतकार्य होऊनी, शमीं जनन मरणें । तूंचि दया करिसी तरि, शुद्ध पदींच असे मिळणें ॥ २ ॥ नित्यानंदपदीं मन उन्मन होउनिया वसणें । सच्चित्सुखिं मज ठेउनिया करीं, स्वस्वरुपीं रमणें ॥ ३ ॥ चिद्रुप चिद्घन ब्रम्हसनातन, ज्ञप्ति अखंडपणें । नित्य निरामय अद्वय अव्यय, कृपें तुझें त्राणे ॥ ४ ॥ मार्ग विहंगम केवळ पाहतां, तेजोमय असणें । **माधवि** नित्य आनंद विराजत, असे तुझें करणे ॥ ५ ॥

## ३५ पद.

ध्यान धरी गुरुचरणीं तूं । सादर हो हरिस्मरणीं तूं ॥ श्रवणीं मननीं निदिध्यासीं रतुनी तूं ॥ धृ० ॥ देशिक कृपें करुनी पावसी **माधव**, तद्रुप होऊनी तरुनि तारण तूं ॥ १ ॥

## ३६ पद.

गुरु दास तुझा स्वामी मी कीं ॥ धृ० ॥ सत्यपरायण मानस जाळें, रतलें निजसुखधामी कीं ॥ १ ॥ दीनजनावन पतीतपावन, प्रीति धरी तव नामी का ॥ २ ॥ भजती जे कां तुझिया पायां, तरती **माधव** हा मी कीं ॥ ३ ॥

## ३७ पद.

साहेब करुणानिधाना, स्वामी तारक निजजना ॥ ध्रु० ॥ दास गुणावगुण नाणिसि तूं मना, माधव कृपाघना ॥ १ ॥

## ३८ अभंग.

नवल श्रीगुरुरायें केलें । द्वैत तेंची अद्वय जालें ॥ १ ॥ सहजीं कर्माकर्म ठेले । माझें मी हें हीरलें ॥ २ ॥ न बोलणें बोलुनि बोलें । माधव निजानंदें डोले ॥ ३ ॥

## ३९ पद.

सद्गुरु तूं अनादिपूर्ण निजस्वामी ॥ धृ० ॥ वंदिता श्रीगुरुचरण, मारुनि जे निजखूण, रात्री सूर्य उदय होणें ॥ १ ॥ ऐसें तुझें इक्षणें, दिवसा चंद्र उदय होणें, नक्षत्रेंसी ग्रहगण ॥ २ ॥ ऐसें तुझें अगाध करणें, फुला आधीं फळ होणें, माधवि हें परिपूर्ण ॥ ३ ॥

## ४० पद.

श्रीगुरु करुणामूर्ति सत्वर ध्यावें पावें ॥ धृ० ॥ भवसागरिं निर्भय हो बैसुनि, शत जर्जर नावें । काम क्रोधादिक लहरी, लागति कीं बहु हेलावे । अहं मद मीनादिक हे ग्रह भासति, मज त्राहे त्राहे-धाउनि त्वां सत्वर यावें ॥ १ ॥ चौऱ्यासी लक्षावरतो भ्रमलों, बहु

अनलों पाहे । नोपेक्षीं श्रीगुरुवर्या, काठी मज धरुनी वहे । ऐकतांचि करुणावाणी प्रकटोनी वरदपाणी, कर्णधार तारक या नावें ॥ २ ॥ नवल प्रगा स्तंभ केला, मध्यें स्थापिला । तेजोमय ध्वज उभारिला, लाउनि सूत्राला । इडा पिंगळा दोन्ही सोहं धारणें धरुनी । सुषुम्णा मार्गे हलु हळकावे ॥ ३ ॥ मूळ वायु हा जाला साहे, परंपार पाहे समुद्रनौका मीच आहे । भव भय भ्रम राहे, सर्व मी सर्वातीत माधव अखंडित दैशिक प्रतीती प्रभावें ॥ ४ ॥

---

## ४१ पद.

गुह्य गोष्ट सद्गुरुनीं ऐसी केली । श्रुतिशास्त्र अगोचर दृष्टि दिली ॥ चंद्र सूर्य नक्षत्रें डाव वाली । निळें चांदणनि शोभा निवळली ॥ १ ॥

---

## ४२ पद.

जालों सुखी, सांगों कवणालागीं ॥ धृ० ॥ आकाशसृष्टि न जाणों कोठें गेली, सुसडा सूर्यकणाची राशी केली ॥ १ ॥ अष्टहि दिशा भरोनी प्रभा जाली, मन हें बुद्धि त्यामाजीं समर्पिली ॥ २ ॥ बाष्प रोमांच दाटति वेळोवेळां, दृष्टि पहतां शून्यचि जालो डोळां । परात्पर पाहतांचि पार नाहीं आला, स्फुरण मात्रांचा जेथुनि उद्भव जाला ॥ ३ ॥ अनंतकोटि ब्रम्हांड पोटिं ज्याला, नाम रूपें त्यासी

अगोचर जाला । मुळासहित सद्गुरुनें हातीं दिला, पाहे पाहतां स्वनंद होउनि ठेला ॥ ४ ॥ अनित्य सांडुनि नित्यत्वातें नेणें, जीवत्व नेउनी शिवत्व कोठें देणें । दुजें नसतां एकत्व कोठें होणें, सद्गुरुकृपें माधवि सबाह्य देणें ॥ ५ ॥

## ४३ अभंग.

जरि विशेष पापी जालो । तरि श्रीगुरुगंगें न्हालो ॥ १ ॥ गंगा स्मरणें दर्शन स्नान । पवित्र करी पातकीजन ॥ २ ॥ नाना दुष्कृतांच्या राशी । दग्ध होती क्षणार्द्धेंसी ॥ ३ ॥ जगद्वृजिन समुच्चय । गंगेमाजीं संचला होय ॥ ४ ॥ गंगा दोषा साधु हरी । तोचि स्वयें अघभिद्धरी ॥ ५ ॥ गुरु तीर्थराज जाणा । माधव करी निमज्जन ॥ ६ ॥

## ४४ पद.

सर्वस्व माझीचि गुरुमाय ॥ धृ० ॥ तान्हे बाळ जाणुनि मातें, मजविण कोठेंही नव जाय ॥ १ ॥ कडिये घेउनी लाडवि माधवा, उतराई मी होऊं काय ॥ २ ॥

## ४५ पद.

या या स्वरुपानें, माझें मन गुरुनें मोहिलें । चित्तध्यान चिन्मय सुंदररूप मनीं पुरुनी उरले । जनीं नयनीं, शयनीं निशिदिनी दिसतें ॥ धृ० ॥ श्वासोश्वास नित्य धरुनी मनीं, पाहत पाहूं कुंडलिनीं । षड्चक्रीं ध्यान धरित, हृदय भरित प्रणव भरित । बिंदु धरित शुद्ध करित, शब्द हा सिद्धांतिचा । निजशब्द गिळुनी शुद्ध जाले, सुखा आले स्वानंद जाले । सतत प्याले, माधव रस तो ॥ १ ॥

## ४६ पद.

स्वरूपांत चला हो सद्गुरुचे पाय पाहतां ॥ धृ० ॥ कुंडली जागची पाही, निशिदिनी तेथें राही, माधवि अनुभव संचलाहो ॥ १ ॥

## ४७ पद.

सद्गुरु कृपें भगवंत ऐसा भेटे, प्राणी होउनी लागावे भजना वाटे ॥ धृ० ॥ सावध होउनि स्वरूपीं लावा वृत्ती, जेथें तेथें भजनावरि धरा प्रीति । चिन्मय पाहतां होईल ऐसी रीती, पाहतां पाहणें होउनी भरे दृष्टी ॥ १ ॥ धारणा धरितां पावसील मुक्त मोतीं, स्थूल सूक्ष्म कारण बिंदु ज्योती । ॐकार स्मरणीं अर्धमात्रा ध्याती, सोहं शब्दीं माधवि सबाह्य वस्ती ॥ २ ॥

## ४८ पद.

सद्गुरुनाथाविण न कळे आन उपाई, चतुर्दश भुवनें शोधितां न पडे ठाई ॥ धृ० ॥ यज्ञ यजुनी स्वर्गाची इच्छा करिती । षड्दर्शनहि विवादें निग्रह करिती ॥ १ ॥ षोडश भूमी न कळुनि ते साधु होती। निगमहि पाहतां नेति नेति हे बोभाति ॥ २ ॥ तीर्थ व्रतें दानादि-व्यर्थवि व्याप्ती । सत्रावी पाहतां माधवि स्वरूपप्राप्ती ॥ ३ ॥

## ४९ पद.

श्रीगुरु हा निजरामसखा । पूर्णब्रम्हीच्या देत सुखा ॥ धृ० ॥ वरद करें स्पर्शुनि मूर्धी । नभ हें गाजत वर्णध्वनि ॥ १ ॥ सच्चित आनद पूर्ण फळें । हें सुख माधविं सहज कळे ॥ २ ॥

## ५० पद.

गुरुविण नोहे ज्ञान रे, जे सच्चिदानंद पूर्ण ॥ धृ० ॥ अद्वयानंद स्वयंप्रकाशक, सदोदित ब्रम्हपूर्ण ॥ १ ॥ मृषा त्रिसर्ग सत्याभावीं, अहंबुद्धि मानसीं पूर्ण ॥ २ ॥ श्रुतिस्मृति श्रीगुरुप्रतीती, आत्मप्रतीती माधवि पूर्ण ॥ ३ ॥

## ५१ अभंग.

ब्रम्ह पाहाविसे वाटे । गुरु सेवे व्हावे नीट ॥ धृ० ॥ अणुरेणुहूनी सूक्ष्म । तेंचि दाविती निःसीम ॥ १ ॥ तेंचि जिकडे तिकडे भासे । ब्रम्ह कटाहवरी असे ॥ २ ॥ पहा अखंडित दीप्ती । सदोदित पूर्ण ज्योती ॥ ३ ॥ सहज ईक्षण करितां ऐसें । गुरु साम्राज्य पदीं बैसे ॥ ४ ॥ ऐसें **माधवासी** केलें । गुरुकृपें फळा आलें ॥ ५ ॥

## ५२ पद.

आत्मसुखीं मन रते तें विषयीं परते ॥ धृ० ॥ सच्छास्त्रें संत्संगति योगें, सद्गुरु सेवा धरितें तै ॥ १ ॥ तीर्थ व्रतें नेमधर्मादि, सत्कर्मे हें करितें ॥ २ ॥ रामकृष्ण गोविंद पदांबुजिं, शिवचरणीं अनुसरतें ॥३॥ नाना संसृति सोडुनि सर्वही, दुष्कृतसंचय हरितें ॥ ४ ॥ ध्यान धारणा आसन मुद्रा, लक्षालक्षीं भरते ॥ ५ ॥ सच्चित्सुख निजज्योतिप्रकाशक अज अव्यय हें वरिते ॥ ६ ॥ पूर्णात्पूर्ण ब्रम्ह सनातन, **माधवें** निज-सुख तरतें तै ॥ ७ ॥

## ५३ पद—श्रीराग.

गुरु भजूं गेले, स्वानंदीं धालें, तेंचि रूप जालें ॥ धृ० ॥ भज्य-भजक भाव सारुनि अवघे, सच्चिदानंदीं ठेले ॥ १ ॥ त्वंपद तत्पद निरसुनि असिपद, निष्कल ब्रम्ह वोतिलें ॥ २ ॥ मायाधव **माधव** हा व्यापक, दैशिक कृपया केलें ॥ ३ ॥

## ५४ पद. ( श्रीविधिहरिहर ही चाल ).

श्रीगुरुराया येउनि दर्शन देउनि मन माझें । कृतार्थ केलें सहजीं ऐसें, वरदपाणि तूझे ॥ धृ० ॥ वदले तुम्ही देवा न कळे, म्हणुनी विनवीतो । प्रत्यक्ष आज्ञा द्यावी आतां, ऐसें इच्छीतो ॥ १ ॥ लडीवाळ निजबाळ तुझे मी, कोणा पुसावें । कृपा करूनी मातें सत्वर, स्वहित सांगावें ॥ २ ॥ दीनबंधजी दीनवत्सला, कृपासिंधु स्वामी । भक्त-काम परिपूरक माधव तूं अंतर्यामीं ॥ ३ ॥

## ५५ अभंग.

स्वामी तुम्हीं माझा, केला अंगिकार । बळें हा वेव्हार, आज्ञा-पिला ॥ धृ० ॥ भजन पूजन, न घडे तुझी सेवा । म्हणुनी तुज देवा, विनवीलें ॥ १ ॥ काम क्रोध लोभ, करिती अंगीं ताठा । श्रीगुरु गोमटा, विसरेना ॥ २ ॥ ऐसी हे प्रार्थना, केली वारंवार । परि आज्ञा थोर, तेची जाली ॥ ३ ॥ आज्ञेच्या प्रसादें, जगीं जालो थोर । पालन विचार, तुझ्याकडे ॥ ४ ॥ आपुल्या विरूदा, सत्य करीं देवा । दीनानाथा नांवा, सांभाळावें ॥ ५ ॥ कृपासिंधु स्वामी, प्रत्यक्ष होऊनी । माधवा दर्शनीं, तोषवावे ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८०

## ५६ पद.

मानस जाले ब्रम्हजाचे सद्गुरुत्वाचे ॥ धृ० ॥ ब्रम्हक्रिया ब्राम्ह-स्थिति दावितां, जे निष्कल निज गुह्य श्रतीचे ॥ १ ॥ हरिहरब्रम्हा अद्वय दाउनी, जें कां निर्मळ निश्चय साचे ॥ २ ॥ स्वरूप साक्षी तुर्या पाहुनी, **माधव** चित्सुखधाम शिवाचे ॥ ३ ॥

## ५७ पद.

काय नवल सांगों आतां, ठाव रिता दिसेना ॥ धृ० ॥ एके ठायीं आहे देव, तेथें भाव धरावा ॥ १ ॥ ऐसी पूर्वी होती मनीं, भिन्न स्थिति भजावे ॥ २ ॥ शरण संतांपायीं गेलो, देव जालो माझा मी ॥ ३ ॥ एक्या बोलें ऐसें जाले, द्वैत गेले निःशेष ॥ ४ ॥ **माधव** भक्तीलागीं प्रेम, उरला निःसीम सद्भाव ॥ ५ ॥

## ५८ पद.

रुचत हें मनांत, गुरुते अचळ मूर्ति, ध्याउनि सकल पूजनविधि करुनी यजावे ॥ १ ॥ धारणेचे सतत स्तवन, लक्षाचे कनकवसन, प्रणवचंदन सुमन सुमन माळे सृजावें ॥ २ ॥ जाळुनिया अहंधूप, उजळुनिया सोहंदीप, स्वानंद रसास्वाद नैवेद्य युजावे ॥३॥ श्रीफळ अर्पुनि मोक्ष सांग, तांबुल हा स्वात्मरंग, दक्षिणेनी योगांगनमनें भजावे ॥ ४ ॥ भावकुसुम अंजुलिसा, समर्पूनी **माधवासि**, मुक्तिवरिल भक्तिसुखें प्रेमें सजावे ॥ ५ ॥

## ५९ पद.

श्रीगुरुचे पायीं माझें, मन रतलें निशिदिनिं बाई ॥ धृ० ॥ स्वात्मसुखस्वानंदाची, प्राप्ति लाभे ये ठायीं ॥ १ ॥ ब्रम्हा शिव ज्यातें ध्याती हृदयीं, मुनि नारद गाई ॥ २ ॥ याचे महिमेची नित्य नवाई, वर्णूं मी काई ॥ ३ ॥ तें हे **माधव** वेउनी अंकीं, कुरवाळी आई ॥ ४ ॥

## ६० पद.

धन्य दिवस आज वर्णू काय श्रीगुरुचे पाय, पाहतां आनंद सृष्टि न समाय ॥ धृ० ॥ कृपापियूषें अवलोकुनिया श्रीगुरुनाथें, संनिधि या वाढुनि कृतार्थ केलें वरदा हातें, सकल मनोरथ सिद्धि हे सहज जाली, **माधवाचें** सहाय सदा करी श्रीगुरुमाउली ॥ २ ॥

## ६१ अभंग

श्रीगुरु चरणाचा मीं दास, सेवा घेई सुखें आस ॥ धृ० ॥ सेवा सर्वस्वें करावी, ऐसी चाड माझे जीवीं ॥ १ ॥ प्रत्यक्ष भावें सदोदित, ऐसें दृष्टीं सदाचित्त ॥ २ ॥ नित्य करावें पूजन, वंदन चरणसंवाहन ॥ ३ ॥ पुरवी मनोरथ देवा, हेंचि मागणें **माधवा** ॥ ४ ॥

## ६२ पद.

श्री गुरुकृपेचे होतांचि वचन, पूर्ण आनंदाचें मूळबीज अहो ॥ धृ० ॥ एकाची त्या बोलें जाही सर्वसिद्धी । अखंडित वृद्धि, स्वानंदाची ॥ १ ॥ या लाभें चरण, वंदी वारंवार । माधव साष्टांगें निरंतर ॥ २ ॥

## ६३ पद.

श्रीगुरु ऐसा हा दाता, नाहीं नाहीं त्रिभुवनीं । सालोक्य सामीप्य सारूप, सहजीं सायुज्य देनी ॥ धृ० ॥ ऐसें हें सामर्थ्य याचें, काय वर्णू मी वाणी ॥ १ ॥ देतो जो आत्मपण, कृपाळवें लक्षुनी । वरदकर माथां ठेविला, गुह्यमंत्र श्रवणीं ॥ २ ॥ तेणें योगे अंतर्बाह्य, ब्राम्हरूप संचले । सच्चिदानंदरूप निजदृष्टीसी आलें ॥ तेजोमय नित्य बहळ, आद्य अव्यय केलें ॥ माधवें निर्विकार, गुरुकृपें अनुभविलें ॥ ३ ॥

## ६४ आरती.

ओवाळूं आरती सद्गुरुरूपा । निजरूपीं साहेब शुद्धस्वरूपा ॥ धृ० ॥ निजबुबळी वाती उजळूनी ज्योती । हृदतरनेहें भरुनी निजमायें ॥ १ ॥ नित्यनिरामय अद्वय अव्यय भासे । कृपें तुझें नित्य वो माय ॥ २ ॥ नीळ पीत श्वेत पाहुनि निश्चित । माधवीं आनंद नित्य विराजत ॥ ३ ॥

## ६५ पद.

श्रीगुरुचरणीं लय लावी, तोचि पांडुरंग भावीं ॥ धृ० ॥ प्रतितिबळें हा हरि गुरु एकचि, दृढतर मति हे करावी ॥ १ ॥ सर्वांकूपीं तू आत्मा जाणुनि, निजसत्ता लक्षावी ॥ २ ॥ तुझा तूंचि मायाधव माधव, निजखुण हें वळखावी ॥ ३ ॥

## ६६ अभंग.

असतां शिशुपणीं, अनुग्रहकहाणी । वंधूतें जननी, कृपें सांगे ॥ १ ॥ गुरुविण गती, गोविंदाची प्राप्ती । नोहे कोणाप्रती, तयावीण ॥ २ ॥ ऐसें हें ऐकुनी, भाव ठसला मनीं । ज्या त्या लागूनी, पुसें भावें ॥ ३ ॥ देव हा भेटवीं, लागलासे छंद । बालक्रीडा वृंदें, सांडूनीया गोविंदाची भेटी, आलिंगन गोष्टी । मनोरथसृष्टी, रची सदा ॥ ४ ॥ ह्मणी कोणी मज, स्वजन सोईरे । सत्कर्म हे बळें, निवारिती ॥ ५ ॥ यालागीं एकांतीं, गुरुसदना गेलों । माधव मी जालों, गुरुकृपें ॥ ६ ॥

## ६७ अभंग.

देवासी भेटोनी, बोलावेंसें वाटे । आवडी गोमटें, रूप पाहूं ॥ १ ॥ बाळपणीं मोठा, लागलासें छंद । आवडी गोविंद, दावा कोणी ॥ २ ॥ साही दर्शनासी, पुसतां शिणलों । सत्संगीं मी नेलों,

भाग्ययोगें ॥ ३ ॥ जयाचें संगतीं, पूर्ण लाभ जाला । सद्गुरु भेटला, मायबाप ॥ ४ ॥ कृपा अनुग्रह, वरदकर होतां । तत्वमसी आत, माझा मीची ॥ ५ ॥ जें जें पाहे तें तें, ब्रम्हरूप भासे । गोविंद हा दिसे, अखंडित ॥ ६ ॥ धन्य हा सत्संग, धन्य गुरुराणा । माधव देखणा, याचे कृपें ॥ ७ ॥

## ६८ पद.

कांहीं यानें केल वो बाई ॥ धृ० ॥ निकटिचि येउनी मना आकर्षुनी श्रवणीं जे फुंकिलें । डोळियांत डोळा खोउनि माझें चित्त चिदानंदीं नेलें ॥ पाहतांचि पाहतां चकित थकित मीं जनिं वनिं कोंदटलें ॥ १ ॥ पूर्णापूर्ण श्रुतिसार जें बहळ प्रकाशलें । निरालंब स्वयंभु सदोदित आपणचा संचले ॥ हरिगुरु नाटक चेटक माधव मम बुद्धि बोवलें ॥ २ ॥

## ६९ श्लोक.

बहूत व्हावे म्हणुनी अजाळा । संकल्प जो कीं स्वरुपींच जाळा ॥ ते वंदितो स्वामिनि योगमाया । केली हरीनें बहुधा रमाया ॥ १ ॥ माये विना ईश कधीं दिसेना । तें भिन्न ईशाविण तो असेना ॥ गोडी अणी साखर येक जाणा । परस्परें भेद नव्हे सुजाणा ॥ २ ॥ हरीचो हे माया परम सुखदा पावनसरीं । तरी होते

लोकां नवल विषयासक्ति भितरीं ॥ हरीच्या पायातें अठउनि मनीं भक्ति करितां । रिता नोहे बोले तरल जन संसार सरिता ॥ ३ ॥ माये विना भेद कधीं घडेना । भेदा विना भक्तिहि ऊघडेना ॥ भक्तीं विना संसृति बीघडेना । संसारि तो मुक्तिहि आतुडेना ॥ ४ ॥ तस्माद्विश्रूचीं गुण रूप माया । वर्णा भवाचे भय हें शमाया ॥ मोहादिकां साधन हें दमाया ॥ उपाय हाची स्वरुपीं रमाया ॥ ५ ॥ म्हणोनि हें तत्व अभक्त माया । माया असें खंडित हो शमाया ॥ माया सतृष्णा सम वीर माया । माया प्रती जन्मि अनूप माया ॥ ६ ॥ हरिगुरु शिवयोगें नाम सच्चित्सुखाचा । हृदय कमळ मध्यें वेद तत्वार्थ साचा ॥ प्रणवमय समीरें लाभ हा कुंभकाचा । निज द्विदळि निरिक्षीं मात्र हा माधवाचा ॥ ७ ॥ निगम हृदय ज्याचें विश्वमुर्द्ध स्वभावें । अखिल रचित लीला चिंतिजे तो स्वभावें । सकल विषयवेत्ता काय त्या वासुदेवा ॥ अतिदिन मनि भावा त्याचि ये वासुदेवा ॥ ८ ॥ विषयींचि विषय तें, नायका नायकातें । विषयचि मुळ पाहे, वाचवी नायकातें ॥ करुनि अबुध यज्ञा, स्वर्गलोकासि जाती । सरुनिहि अव पुण्या, मृत्युलोकासि येती ॥ ९ ॥ न कळति मनि ज्यातें, भेद हे नायकांचे । पशु सम नर कींडे, भक्षि जैवी तृणाचे ॥ बुध जन रतिसर्गें, कामिनी कामर्मूर्ति । प्रफुल्लित नळिनी जे, पाहुनी भानु दीप्ती ॥ १० ॥

॥ श्रीवरदमूर्तये गुरवेनमः ॥

# अध्यात्मवर्णन.

---

## ७० पद (गजल)

---

प्रत्यक्ष रूप दिसते, नाहीं कसें म्हणावें । निजदावि त्या गुरूला, ऐसे कसें म्हणावें ॥ १ ॥ हें पीत स्वेत काळे, गगनी तारा नभांत । इंद्र नीळ मुक्त भरित, नाहीं कसें म्हणावें ॥ २ ॥ सूक्ष्म तेज दिसतें, अणु रेणुसे असें । निःशून्य शून्य भासें, नाहीं कसें म्हणावें ॥ ३ ॥ नासोग्रिंन्यस्त दृष्टी, करुनी असें पहावें । माधर्विं सबाह्य वस्तु, नाहीं कसें म्हणावें ॥ ४ ॥

---

## ७१ पद.

---

टेकावरी टेकुळें तेथें निज खूग । असे एक बाळी सुंदर ॥ धृ० ॥ रक्त स्वेत पीत बुंधो, नेसोनि सोनसळी ॥ १ ॥ प्रथमी त्रिवड श्याम केश हे, शशि सूर्य हें लाउनि भाळीं ॥ २ ॥ श्याम बिंदु भ्रूमध्यें रेखुनि, निज शोभा निडळीं ॥ ३ ॥ नासाग्रीं सुपाणि झळके, मणिमय ब्रम्ह किळीं ॥ ४ ॥ श्रीगुरुकृपेची तटके, श्रवणी गुह्य फळीं ॥ ५ ॥ कंठ सूत्रीं सोहं तंतुसी वोउनि, सौभाग्य परिपूर्ण

फळीं ॥ ६ ॥ मुक्त मोती भूषण ज्याली, दृश्य कंकणी शोभा आली ॥ ७ ॥ अतिशय सूक्ष्म मध्यें जीची, जडली चिद्रत्न किळी ॥ ८ ॥ मूळ पदीं निज गतिसी चालत, बावन कस ज्याली ॥ ९ ॥ गुह्यागुह्य हें अति विमळी, माधव हृत्कमळीं ॥ १० ॥

---

## ७२ पद.

आत्मवस्तु लक्षीं जीवनी या जीवनियाचें सार्थक ॥ १ ॥ उतरळासि तूं उर्ण नाभि परि, सोहं तंतू घेउनिया ॥ २ ॥ आधारादि षट्चक्रें भेदुनि, सहस्रदळीं सम होउनिया ॥ ३ ॥ गुरुकृपीं द्विदळीं **माधव**, ककारांत निज पाहुनिया ॥ ४ ॥

---

## ७३ पद.

करीं बा एकादशी, नित्य चैतन्य होशी । सद्गुरुसी शरण जातां, प्रतिपदीं मानसीं ॥ १ ॥ जीव शिव द्वैत जाले, विवेक अविवेकें केलें । मूळ हें स्मरण धरीं, सहजीं एकत्र आलें । करी बा एकादशी ॥२॥ त्रिगुण तापत्रय, याचा करूनिया लय । इडा पिंगळा सुषुम्णेसीं, धरी धारणेची सोय ॥ ३ ॥ चित चतुष्टय चारी देह, त्यातें सोवूनि पाहे । लय लक्ष ध्यान मुद्रा, तेथें निरंतर होई ॥ ४ ॥ पंचभूत पंचकोषें, देही वसती सावकाशें । यांत तुझें काय आहे, दूर करीं पंचाक्रोश ॥ ५ ॥ षड्रिपु षड्रसा, त्याचा घरुनिया त्रास । ज्ञान खड्ग घेउनिया, वैरी करी निःशेष ॥ ६ ॥

सप्तधातु शरीर हें, हें तो नासीवंत आहे। याचा तुज मोह कां रे सर्व दोष रूप पाहे ॥ ७ ॥ अष्टधा प्रकृति हे, अष्ट रिद्धि सिद्धी पाहे याचा तूं त्याग करी, आत्मचिंतनीं राहे ॥ ८ ॥ नवविधा भजन करी, औट पीठा सेजारी। नवद्वारीं निरोधूनी, ऐसा अभ्यास करी ॥ ९ ॥ दश प्राण तुज देहीं, दशम द्वारांतूनी पाहीं। मग तुज सिद्धी जाली, लय सद्गुरु पाईं ॥ १० ॥ येकावरि येक आलें, मन एकादशी केलें। माधवी स्वरूप पहात, सोहं शब्दीविण योजिले ॥ ११ ॥

## ७४ पद

स्वरूपाविण नरदेह जाला, व्यर्थचि सिण मायपित्याला। तीर्थें व्रतें नेम धर्म हा त्यजिला, धिग् धिग् तयाला ॥ १ ॥ येकें गुरु नियश्च केला, पाउनि निज परमपदाला। साम्राज्याचिया पदवी आला, धन्य धन्य तयाला ॥ २ ॥ प्रणविंच्या निज बीजाला, लक्षुनि निज परात्पराला। माधव सच्चित् आनंदीं धाला, निजसुख चिंतयाला ॥ ३ ॥

## ७५ पद.

धारणा तूं ऐसी धर, गायत्रीच निज सार। परमहंस ॐकार दृष्टि पाहे ॥ १ ॥ जया करुनी गोचर, परमज्योति निरंतर। विधमहि परमसार शून्यचि आहे ॥ २ ॥ तनु ब्रम्ह हेंची सार, प्रथमाचें अग्राहार। त्यांचा घेउनि साक्षात्कार ब्रम्हचि पाहे ॥ ३ ॥ सद्गुरुचें चरण सार, माधव तेथें निरंतर। स्वरूपाचा परात्पर, पाहुनि आहे ॥ ४ ॥

## ७६ पद.

अंगीं अंगीं पूर्ण भरलें, भरुनि उरलें तेचि वस्तु । चरणी चाले वरी वायुसी फेराफेरी, नाहाले अंबरीं तेचि वस्तु ॥ १ ॥ पूर्णात्पूर्ण हें शून्यचि जालें, अच्छादुनि निज हें व्यापिले वस्तु । आदि अंत रहित गुरु कृपें, **माधव** जेथें तेथेंचि वस्तु ॥ २ ॥

## ७७ पद.

आत्मवस्तु नित्य स्वरूप । श्रीगुरुकृपेचा ज्ञानदीप ॥ धृ० ॥ हृत्कमळीं स्नेह सोहं सूत्रवाती । गुरुवाक्यें श्रवणी प्रगटली ज्योती ॥ १ ॥ इंद्रिय मक्षिका वारीं धारणा हातें । सच्चित्सुखाचा जेउनि भात ॥ २ ॥ सत्रावीच क्षीर वेई स्वानंद शर्करायुक्त । ऐसेचि स्वरूप लक्षीं चंद्रकळा पीत ॥ ३ ॥ सहस्त्रदळीं वास करी भ्रमर गुंफे आंत । सद्गुरु वरद करें **माधव** तृप्त ॥ ४ ॥

## ७८ पद.

आत्म्याविण काय हें रचिलें । गुज निरीक्षी सुजाणा ॥ १ ॥ पूर्णब्रम्हीं अहं स्फुरलें । प्रणव मात्रें सर्वचि संचले ॥ २ ॥ विवी जोंवरी दृष्टि नसे तुज । माया मृगजळ सत्यचि सुचलें ॥ ३ ॥ श्रीगुरु कृपें **माधवि** सहजें । पूर्णतत्व हें रुचिसी रुचलें ॥ ४ ॥

## ७९ पद.

श्रीगुरुकृपें सच्चिदानंदीं तत्वमसी तो तूं ऐसें बोधले सखया । लय लक्ष निज धारणेसी ब्रम्ह विलोकिलेस सखया ॥ १ ॥ अणु रेणु ऐसी उघडलें दृष्टी भासे पूर्णपणें सखया । मुक्त मोतीं जेविं विखुरलीं नभीं निबिडपणें सखया ॥ २ ॥ रक्त स्वेत पीत आभास रहित ऐसे एक जाणे सखया । धुंधुरू ऐसे सर्पाकार दिसे ज्योतिपणें सखया ॥ ३ ॥ अतसी पुष्प सम विमळ कांती पूर्णदीप्ति डोले सखया । मयूर पिच्छें डोळा सुनिळ प्रभा बिंदु हाले सखया ॥ ४ ॥ चंद्र सूर्य ग्रहगण तारामय प्रकाश वहळे सखया । माधविं स्वानंद नित्य विराजित स्वात्मफळें सखया ॥ ५ ॥

## ८० पद.

औट हातां आतौतें । अंतर्बाह्य पूर्ण । जे न कळोनिया स्थित आपणयांचि असे वो ॥ १ ॥ ऐकिजे तयाची खूण रक्त श्वेत शामपण । अंगुष्ट पर्व हे जाण तयाद्धर्धि वो माय ॥ २ ॥ तें हा डोळा प्रकाशे, पीतपणें आवर्त्त दिसे । शाम बिंदुलेविलसे, सक्ष्म ज्योति वो माय ॥ ३ ॥ तये ज्योती निरीक्षण, तेणे स्वस्वरूप दर्शन । जें कां दिसे बिंदुलेपणे, तें संताचे गुज वो माय ॥ ४ ॥ ऐसें श्रीगुरुचेनि प्रसादें, माधविं विलसे पूर्ण बोधें । पाहुनि स्वस्वरूप आनंद, आन नसे वो माय ॥ ५ ॥

## ८१ पद.

जेथ वर्णना व्यक्त नाहीं । तेथ आपण यांचि संचले पाहीं ॥ आब्रम्ह भरुनी राहे । निज गुज वो माय ॥ १ ॥ जया ब्रम्हाना परौतें । स्वयं तेज संचलें निरुतें ॥ तया दृष्टिचेनि हातें । धरूं धावे वो माय ॥ २ ॥ तेथ नवला नवल जालें । सूक्ष्म बिंदुसे उमटलें ॥ प्रभा पाहोनिया ठेलें । मन चकित वो माय ॥ ३ ॥ तेथ बिंदु ना येक ज्योती । बहुलपणें प्रकाश दीसी । नाना नक्षत्रें तळपती । अखंडित वो माय ॥ ४ ॥ कीं विद्युल्लतेची झळझळाटी । मयूर पिच्छा ऐसी वनदाटी ॥ कीं चंद्र सूर्य निकटीं । ऐसें दिसे वो माय ॥ ५ ॥ तया इंदु भास्कर निरखितां । नीळ शामलचि सर्व सत्ता ॥ तया माजि अवलोकितां । माझा मीचि वो माय ॥ ६ ॥ ऐसा श्रीगुरुप्रताप पूर्ण । माधव दृष्टि अवलोकुन । स्वानंद निजानंद पूर्ण । भरुनि ठाके वो माय ॥ ७ ॥

## ८२ पद.

अगाध समुद्र जळीं मी होउनि मासोळी । कां पक्षिया नभ मंडळी थांबलाहे ॥ १ ॥ तैसें हे सच्चित्ज्योती घडल । पूर्ण तत्वचिया उघडलें ॥ सद्गुरु कृपें दृष्टिसि आलें । निज तत्व तें ॥ २ ॥ तें जेथ अधोर्ध्व नाहीं । आपणयांचि संचलें पाहीं ॥ आब्रम्ह व्यापुनि राही ।

तें हें तत्व ॥ ३ ॥ जेथ पैल ना पैल दिसे । आपण यावे स्वयं प्रकाशें ॥ सदोदितपणें विलसे । परं ज्योतिसीं ॥ ४ ॥ तेंचि लय लक्ष करा । धारणेंसी पूर्ण धरा ॥ तेथ आवरोनी प्रणव सारा । शनैः शनैः ॥ ५ ॥ सोहं गुजाचि सांकडी । भृपल्लवें करुनि देहुडी ॥ सम्यक् दृष्टिचे आवडी । खेंचरीसी ॥ ६ ॥ नासाग्रीं करोनि दृष्टी । तेथ होतसे पियूष दृष्टीं । स्वरूपाचिया घनदाटी । चिद्घन वोळे ॥ ७ ॥ तेथ गडगडोनी नभ गाजे । चिदानंद बोळोनी सहजें ॥ ज्योतिर्मय वृष्टिचेनि तेजें । चहुं दिसी भरे ॥ ८ ॥ तेथ विद्युल्लतेचेनि झळझळाटे । आकाश शोभतसे गोमटें ॥ तेथ सहज धारणा आटे । आपण पा माजी ॥ ९ ॥ स्थूल सूक्ष्म घन बिंदू । कीं मोतियेंच वर्षति स्वानंदू ॥ तेथ देखूनिया आल्हादू । स्वात्मरूपें ॥ १० ॥ मयूर नाचती नानापरी । नीळ शामल पिंजरी ॥ कीरसेन पंक्ति साजिरी । दिसे कैसीं ॥ ११ ॥ जेथ साधु साधक निवती । ऐसी प्रकटोनी आत्म ज्योती । सद्गुरुकृपें स्वानंदप्राप्ती । माधवासी ॥ १२ ॥

---

## ८३ ओव्या.

---

दशदिश विध पवन दोरा । तो विवोळोनि मूळ चक्रा । वोढोनियां आंत बाहिरा । सरिसा कीजे ॥ १ ॥ सोहं सूत्राचेनि हातें । वाम सव्य चक्र फिरतें । जगीं खेळिजे जगन्नाथें । तें हें चक्र ॥ २ ॥ विरंचि वर्ते सांवळेपणें । नीळ सुनीळ सचित्कीर्णें ॥ सगुण रूपें

बाळपणें । करित लीला ॥ ३ ॥ हे चित्कळेची लीला मूर्ति । गुरु कृपेविण नये हातीं ; माया खेळाची तत्व संपत्ती । लाधेल केवीं ॥ ४ ॥ या लागीं गुरुसीं शरण होतां । चक्र लीला येईल हातां । माधव स्वानंदें खेळतां । सुखिया जाला ॥ ५ ॥

---

## ८४ ओव्या.

---

अधोर्ध्व पवना । आकर्षोनी नयना । नासाग्रीं मना । स्थिर करीं ॥ १ ॥ ऐसें धरुनी ध्यान । मना मागें ठउनी मना ॥ अलक्ष लक्षाची धारणा । दृढ कीजे ॥ २ ॥ ऐसें जे लक्ष । हरिहराचें प्रत्यक्ष ॥ सबाह्य अभ्यंतरी साक्ष । पुरेल सहजीं ॥ ३ ॥ जे सच्चित्सुखाची खाणी । श्रीगुरुकृपें स्वानंद पूर्णी । माधव अखंडितपणी । तृप्त जाला ॥ ४ ॥

---

## ८५ पद.

---

गुरुवचनीं निक्षेपी मन सहजचि उन्मनवो । कृपावलोकन मात्रें निवसी तूं सोहं सूत्रें होसिल चिन्मय हो ॥ धृ० ॥ पूर्णापासुनि अहं स्फुरलें हें मूळ जाळ । त्रिगुणात्मक विराट अगीं भरलें समसमान रचिलें ॥ माये व्यापुनि अवघी भरलीं औदुंबर न्यायें सृजिलीं ब्रम्हांडेवो ॥ १ ॥ वेदांत श्रुति अंतर्बोध महावाक्य शुद्ध । श्रीगुरु

बोधवितीं मूळशब्द तोडुनि भवबंध ॥ सचित्सुखाची खाणी दाउनी निज नयनीं सोहं निर्धारवो ॥ २ ॥ नासाग्रीं ठेउनिवां निजदृष्टी निळ बिंदू वोटी । चैतन्य स्वरूपें भरली सृष्टी स्वानंद वृष्टी ॥ ऐसें निज बोधा आलें गुरुकृपें प्रकाशलें माधविं निजगुजवो ॥ ३ ॥

---

## ८६ पद.

हे रजु कांहीं । यानें केलें वो बाई ॥ धृ० ॥ निकटचि येउनि मना आकर्षुनि श्रवणीं जे फुंकिलें । डोळियांत डोळा खोउनि माझें चित्त चिदानंदीं नेलें ॥ पाहतचि पाहतां चकित थकित मी जनिवनि कोंदाटले ॥ १ ॥ पूर्णात्पूर्ण श्रुतीसार जे बहळ प्रकाशलें । निरालंब स्वयंभु सदोदित आपणपां संचलें ॥ हरिगुरु नाटक चेटक माधव मन बुद्धीं बोधलें ॥ २ ॥

---

## ८७ अभंग.

गुहरायें नवल केलें । माझें मनचीं सिदळ जालें ॥ धृ० ॥ परद्वारीं राहे सदा । प्रवृत्तीसीं नये कदा ॥ १ ॥ नकरि गृहाचे उद्दीम । राहे तिकडेच निःसीम ॥ २ ॥ मन न लाजे जनासी । माधव रतें उन्मनीसी ॥ ३ ॥

## ८८ अभंग.

नाम निर्देशा वांचुन । आळवी त्यां बोले कोण ॥ १ ॥ नाम अनामाचें ध्यावें । तोची हृदई स्वभावें ॥ २ ॥ जो कां अव्यय अखंडित । स्वयं तेजें सदोदित ॥ ३ ॥ तेथें एकाक्षर वर्ण । जेथुनि प्रकट संपूर्ण ॥ ४ ॥ नाना नामें घेतां त्यासीं । हांकारिल्या बोले कैसी ॥ ५ ॥ तेंचि नाम चंद्रचूड । उमें उपदेसी बाडें कोडें ॥ ६ ॥ सदोदित ब्रम्हज्योती । निज डोळां दावी दीतो ॥ ७ ॥ गुरु परंपरा धर्म । **माधवासी** लाधले वर्म ॥ ८ ॥

## ८९ अभंग.

निज नाम आत्मकळा । धारणेंसी अवलीळा ॥ १ ॥ गुरुकृपें अनुग्रह दृष्टी । स्वरुप दिसे व्यष्टि समेष्टी ॥ २ ॥ सच्चिदानंद निज ज्योती । सहज लीळे दिधली हातीं ॥ ३ ॥ स्वयंप्रकाश सदोदित । **माधव** पाहे अखंडित ॥ ४ ॥

## ९० ओवी.

विवेकवस्तुचे सार । निज गुह्य जे परात्पर ॥ गुरुकृपेचे स्वरूप सार । परसिजे ॥ १ ॥ श्रीगुरुकृपा पसाये । ऐकिजे जिवशिव पणाची सोय । जेणें जिव अहंतेचा ठाये ॥ समूळ निरसे ॥ २ ॥

हंसोहंस सद्गुरु गृहीं । तयाची वण व्यक्ति पाही ॥ कृपाप्रसादें लवलाहीं । आंगेचि वडे ॥ ३ ॥ हा प्रसाद श्रीगुरुचा । गुह्य मंत्र निजाचा ॥ पत्रीं लेखन सत्यसाचा । तयाचे कृपें ॥ ४ ॥ गुरु गृहिं येक पाहिलें । तव तेथें नवल चोजवले ॥ तेथें पक्षी दोन पाहिले । येकाचि वृक्षीं ॥ ५ ॥ एक कर्म फळातें भोगित । येक निवृत्ति न कळित । दोहींसी साक्षित्वें वर्तत । निरालंब जे ॥ ६ ॥ तेथें मन माझें उवाइलें । तव मिळोंड जोनि विनाविलें । कृपाळूपणें मज पाहिजे दिधलें । हंसोहंस हे ॥ ७ ॥ तैं श्रीगुरु कृपामूर्ति । कृपानुग्रहें होत्रो म्हणती ॥ तं मी मूर्ध्नीं श्रीगुरु चरणाप्रति । साष्टांगें नमिलें ॥ ८ ॥ तिहीं वरद करें मम मूर्ध्नीसी । तैं मी स्पर्शितां जालो स्वानंद राशी । हंसोहंस मम गृहासी ॥ प्राप्त जाले ॥ ९ ॥ तव मी बुझावितां तयासी । तव तें वियाळी पिलियासी ॥ अगणिताकारें आकाशीं । भरोनि ठेली ॥ १० ॥ तैं मी विचारिलें मनीं । यासी चारा आणिजे कोठुनी ॥ तैं श्रीगुरुचो नवल करणी । वर्त्तली ऐका ॥ ११ ॥ तेथें क्षीराब्धि ऐसे हलवले । गगन मुक्ताकारें भरलें । तेथें हंसोहंसिनीचो पिलें । चरोनि धालीं ॥ १२ ॥ तै किलकिलोनी स्वानंद शब्दें । अंबर भरलें असे नादें ॥ किणकिणी वेणवादि भेदें । गर्जती मेघ ॥ १३ ॥ तेथ नवलानवल चोज जालें । तेथ रत्नाकर ऐसे हलवले ॥ हंसोहंसिनीचो पिलें । चुवकळोनी ठेली ॥ १४ ॥ तैं त्या रत्नाकराचिया लहरी । रक्त श्वेत पीत नीळाकारीं ॥ कीं हिरकिणियाची अंबरीं । विखुरिल्या आहतो ॥ १५ ॥ लाटा हेलावती येकसरें । आवर्त्त दाविती सर्पाकारें ॥ जैंवि नभ तारामय

सारे । बुद्बुद तेवों ॥ १६ ॥ महामीन झळमळिती । अनेक नेत्र पंक्ति झळकती ॥ तैं त्या पिलियाची मति । बुझाउनी टाके ॥ १७ ॥ तव बोलला चिद्घन । आकाश भरोनी ठेले पूर्ण ॥ कीं काजवेनि भरीत गगन । बिंदु तैसे ॥ १८ ॥ तयें मयूर आनंदें नाचती । कोकिळे ऐसे शब्द होती ॥ तेथ चक्रवाक पाक्षियाची गति । तटस्थ जाली ॥ १९ ॥ तेथ विजूचेनि झळझळाटें । मयूर पिच्छा ऐसी पिंजरी दाटे ॥ तेथ चैतन्य सुख अवचटे । पाहिला दृष्टी ॥ २० ॥ तेथ वृक्ष तो कैसा । आब्रम्ह भरोनी पूर्ण ऐसा ॥ अखंडितपणें स्वयंविलासा । थांबला असे ॥ २१ ॥ तथ सुवर्ण पक्षी ऐक्य गति । उडोनी आविशाळ लाविती ॥ तया आविशाळाची गति । अखंडित पै ॥ २२ ॥ ऐसा अविशाळाची वित्पत्ति । चक्रांतर्गत चक्र प्रदीप्ति ॥ तेथें प्रवेशुनी सूक्ष्म गति । अद्वयेसीं ॥ २३ ॥ तेथ वृक्ष नाडाळ मुळ । स्वयंतेजें प्रकाश बहळ ॥ हें श्रीसद्गुरु कृपाफळ । सदैव लाहे ॥ २४ ॥ हें सद्गुरुकृपा विमळ । **माधवीं** स्वानंद सुख केवळ ॥ ........................ पूर्ण असे ॥ २५ ॥

---

## ९१ पद.

---

कैंचेरे द्वंद्व कैंचेरे । अहर्निस नाम घेतां वाचेरे ॥ ध्रु० ॥ हरिगुरु कृपेचा विचार, ब्रम्ह पाहतांचि साचार । त्यजिता विषयाचे उपचार, सावध होता अंतरीं ॥ १ ॥ शांति क्षमेचे अनुकार । अंगा आलिया

अविकार ॥ न वडे कवणातें अपकार । सर्वहि आत्मा जाणुनी ॥ २ ॥ शोध करितां सारासार । कळला चिद्विलास संसार ॥ ब्रम्ही वृत्ती तदनुसार ॥ **माधव** पूर्ण निजबोधें ॥ ३ ॥

---

## ९२ पद.

---

प्राणिया उगलेची भ्रमणें ॥ ध्रृ० ॥ तीर्थ व्रतें नेम धर्मादिशास्त्रा-भ्यासें वोकितां श्रमणे ॥ १ ॥ नानामतांतरिच्या भेदां, व्यर्थचि काळ कां जी क्रमणे ॥ २ ॥ विश्वेश्वर हा हृदई वसतो, तत्पद त्वरितचि आक्रमणे ॥ ३ ॥ **माधव** व्यापक जाणुनि आत्मा, श्रीगुरु रामपदांबुजि रमणे ॥ ४ ॥

---

## ९३ अभंग

---

तुज वाटे ब्रम्ह व्हावें । तरि गुरुला शरण जावे ॥ १ ॥ अहंपणे जरि तूं जीव । होसी व्यापक सदाशिव ॥ २ ॥ लोह परिसेसी झगडले । तेंचि अंगें कनक जालें ॥ ३ ॥ निजवाक्य तत्वमसी । ऐसा बोधें तें तूं होसी ॥ ४ ॥ विजितात्मा जितश्वास । स्वसंवेद्य स्वप्रकाश ॥५॥ ऐसे श्रीगुरु कृपें जोडे । **माधव** अनुभव रोकडे ॥६॥

---

## ९४ अभंग.

अर्धी हेचि शस्त्र धरूं । अम्हां जन्मर्त्री त्यासी मारूं ॥ १ ॥ मग मारूं आपुली माय । ईपात्स्त्र संगें सुख होय ॥ २ ॥ ऐसें करूनियां कर्म । हाचि अमुचा हा स्वधर्म ॥ ३ ॥ गुरु कृपे चापसायें **माधव** स्वानंदें वर्त्तताहे ॥ ४ ॥

## ९५ पद.

विश्व कीं हे घोतलें, सच्चित्सुख आत्मारामें तेणें ॥ धृ० ॥ नित्यनिरामय अद्वय अव्यय, गुरुकृपें **माधविं** सबाह्य संचलें जेणें ॥ १ ॥

## ९६ पद.

पूर्ण ब्रम्ही अहमस्मि, प्रकृति पुरुष हा जाला हो ॥ धृ० ॥ उत्पत्ति राकास्थिति राकाळ, पहा करिता कोणहो ॥ १ ॥ एकें असे हा अविद्या ग्रासित, जीवदशें हा ठाहो ॥ २ ॥ पांचाचा पंचविसा विकारा सहित लिंगदेह या नामहो ॥ ३ ॥ पुर्विल रीति हे अहंत्वे ऐसी, व्यतिरेक अन्वय कैसाहो ॥ ४ ॥ ऊर्णनाभिपरि सुक्षेम तंतु, प्रपंच विस्तार ऐसाहो ॥ ५ ॥ मुळ हा तंतु ऊर्द्धि ग्रासुनी अन्याअन्य भाजुनि उरला हो ॥ ६ ॥ उरला बिंदु त्यांतहि लक्षिता, ब्रम्हतेजा प्राप्त जालाहो ॥ ७ ॥ सदगुरु कृपें **माधव** ऐसा, पूर्ण ब्रम्हरसिं धालाहो ॥ ८ ॥

## ९७ पद.

अहो तो योगी सच्चित्सुख अनुरागी । लंपट होउनि परनारी तें स्वच्छंदें सुख भोगी ॥ १ ॥ सांडुनि जेणें कुलस्त्रियांतें परद्वारीं निज अंगीं ॥ २ ॥ शंका सर्व जनाची वर्जुनि, चौवा साक्षिसी भोगी ॥ ३ ॥ वर्तुनि श्रीगुरु संगें, **माधव** रंगला निजरंगीं ॥ ४ ॥

## ९८ पद होळी.

होळी स्वानंदें खेळुनि पाहीं । श्रीगुरु लागीं शरण जाई ॥ ॥ धृ० ॥ ध्यान धारणा आसन मुद्रा, लक्षुनि लक्षा दृढ होई ॥ १ ॥ काम क्रोधादि इंधनें रचुनी, ज्ञानाग्नि लाउनि ते ठाई ॥ २ ॥ द्वैत नारी केळ त्या मार्जा होमीं, वासना पोळी टाकुनि देई ॥ ३ ॥ मूळ शब्दें गर्जुन सहजें, रंगी रंगुन निज घेई ॥ ४ ॥ चूवा चंदन सुगंध ऐसें, अबिर गुलाल तये ठाई ॥ ५ ॥ डफ झांजर मृदंग वाजती, दशविध वाद्यें मन देई ॥ ६ ॥ सोहं सूत्राची पिचकारी घेउनि, रंगी सुरंग स्वयें होई ॥ ७ ॥ प्रिया तूर्येसी अंतर खेळें, उन्मनि संगें सुख घेई ॥ ८ ॥ ब्रह्मविद्येचे कीर्तन गायन, **माधव** श्रीगुरुचे पाई ॥ ९ ॥

## ९९ पद.

पाहे परात्पर अव्यय निष्कळ निरामय भरित ॥ धृ० ॥ त्वंपद तत्पद असिपद तेथें, अर्द्धमात्रा साक्षी । भूत देही देहातीत आहे, लक्षा आंत पाहे । प्रमाणाचा प्रांत, ऐसे शुद्ध सत्य । प्रमाण विरहित, जेथें रमति योगि संत ॥ १ ॥

## १०० पद.

वो माय सांगो कैसे । वो माय सांगो कैसे ॥ ० ॥ श्वेताति श्वेत होउनी निश्चित अचल अटळ पद जाले । स्थूल सूक्ष्म सर्वही ग्रासुनिया तेथें नित्यानन्द प्रकाशलें । स्वयं ब्रह्म ऐसें बोलती श्रुति मूल जेथून विस्तारलें । एक शुद्ध नित्य निर्मळ निराभास त्यातें अनुपम दुसरें ॥२॥ तिसरें तेथें कोटि काळ हे ज्योती चौथ सोज्वल प्रकासिलें । पांचवें तेथ कोटि सूर्यातें ग्रासुनि आपण आपातीत जाले । ऐसा हा सिद्ध स्वानंदी, आनंद नादातीत नाद जालें । सद्गुरु कृपें माधवें लक्षिता, मन हें उन्मन जालें ॥ ३ ॥

## १०१ पद.

वो माय सांगो कैसें, चिन्मय पाहिला हो ॥ ध० ॥ पाहिला म्यां सद्गुरु पीठीं औट पिठा निकटीं ॥ १ ॥ उमा अनादि शुचि सत्ता भुवनि ज्याची पाहे स्वरूपा निज वंटी ॥ २ ॥ शून्याचा सेवट तेथें स्वरूप निकट, माधव न करितां हट खटपट ॥ ३ ॥

## १०२ पद.

नर तो नरकीं पतन कसा, साधु हो ॥ धृ० ॥ स्वर्गातुनि हा सपत्ति वउनी, नरकीं पतन कसा ॥ १ ॥ अधो नर्कची ऊर्ध्व नरकची, याचा

भाव कसा ॥ २ ॥ पूर्वान्वोध हा विसरुनि सहजीं, कोहं म्हणुनि असा ॥ ३ ॥ ब्रम्हची पूर्वीं सेवटि ब्रम्हचि, याचा भाव कसा ॥ ४ ॥ सद्गुरु कृपें माधवी लक्षितां पूर्ण ब्रम्ह असा ॥ ५ ॥

## १०३ पद.

त्याची बुद्धि कसी, संसृति ज्याला स्पर्शी ॥ धृ० ॥ पूर्व पदा विसरोनी सर्वहि ब्रम्हचि आपण मानी ॥ १ ॥ अलक्ष्य लक्षीं नाहीं वदतो, सर्व साक्षि मी पाही ॥ २ ॥ हृत्कमळींच्या सारा न कळुनी, पूर्ण ब्रम्ह विचारा ॥ ३ ॥ सद्गुरु स्वरुप पसारा माधव दृष्टि पूर्ण विचारा ॥ ४ ॥

## १०४ लावणी.

हरि गुरु संगें रतले बाई, हें मानस परतेना । त्या स्वरुपी जडले मन आतां, आणिक भासेना ॥ धृ० ॥ धरा अंबरीं पाहतां वायु तेज आप जालें । त्रिगुणा ईक्षण मात्रें स्वेत ब्रम्हांड रचिले । ब्रम्हा विष्णु रुद्र मायामय अवघे केले । कांचन सूत्रीं जैसें कांचन मणि गण वोविले । अज अव्यय हें मूळच असतां ब्रम्हपणें स्फुरलें । दूध मुरालें दधि जालें तैसें हे कीं परिणमिलें । समजले मना । सांगवेना ॥ १ ॥ विषयीं रत मी असता बाई नवल कसें जाले । जन्मांतर सुकृतें अवचट गुरु सदना गेले ॥ वरद करें मम मूर्ध्नि स्पर्शनी अधिकारी केलें । तत्वमसी

निज बोधें स्वात्मसुखीं रमविलें ॥ ब्रम्ह परायण वृत्ति तेव्हां सहज गति जाल्या । पूर्णबोधें निवाल्या । सस्वरुपीं रंगल्या । ध्यान धारणा अनुभवें ध्यान धारणा । सांगवेना ॥ २ ॥ सोहं अंतर लक्षी दृष्टी बाह्य करूं जाता । सूक्ष्म तेज पूर्ण भरित दावी निज सत्ता । व्याप्य व्यापक स्थिरचर अवघा ठाव नसे रीता । सच्चिद किरणें झळके पूर्ण तेज हे आतां । सुवर्ण कीटा सम भासे ते माया स्वरूप, मूळ मायेचे ते रूप । रौप्यतारा अमूप । कोंदल्या नभीं अनुभवे कोंदल्या नभीं । सांगवेना ॥ ३ ॥ कृश मोती बहु मुक्तें भासति ब्रम्ह रूप जाणा । तारा रूपें धुंदुरु दंडक तो यादवराणा । कीर नेत्र नीळ सुनीळ नीळकंठ माना । चन्द्र सूर्य सम ईश्वर साक्षी, आलेसे ध्याना । तेथिल नीळी खोउनि दृष्टी तेजोमय पाहे । माधव अखंडित आहे । शाश्वत आनंद लाहे । श्रीगुरु कृपें, अनुभवीं श्रीगुरु कृपें सांगवेना ॥ ४ ॥

## १०५ लावणी.

बहुजन्माचे सुकृत प्राण्या नरतनु सांपडली । राजउकरडा खर कुड्याची परि तू जाली ॥ धृ० ॥ पंचिकर्ण सिद्धांत पाहुनी स्थूल हें उभारिले । तत्व पांच गुण पंचवीस हे अगम निगम बोले । चवदा चक्रीं बावन मातृका साधन सखोले । इडा पिंगला मार्ग सुषुम्ना समाधि सुख डोल । देहें शोधिलें नाशवंत हे नोहे निज वस्तु । विचारुनि पाहे नेमस्तु । सुक्ष्म देहऱ्या स्वस्तु । विच्यारुनी मल भऊा विच्यारु गुरु-किल्ली । आतांचि साधन साध्य करुन घे निज वस्तु अपुली ॥ १ ॥

उवड समाधि सद्गुरुनाथें बसैविलें माय। सूक्ष्म झाडा करून देती सुगम उपाय। अंगुष्ठाकृत म्हणती यातें परि न्यून्यायें। रंग सुरंग कर्पूर स्वेत हा लिंग देहें। स्वप्नावस्था विष्णु माया परि नाशवंत। टीकु ब्रम्ह रक्त पीत असे बोल सिद्धांत। वेद श्रुतिसीं हेंचि बोवी आतांचि साधनुसा ॥ २ ॥ कारण देहें अर्थ पर्वतीं शाम तनु ज्याची। रुद्र देवता प्रभा फांकली परवार्ध कांतीची। सुषुप्ति तेथें पूर्ण अवस्था खूण अज्ञानाची। तापस गुण कीं अग्नि तत्व मकळ चैतन्याची ॥ मकार मात्रा ऐक सगुणा अथवा आभास। परि ते प्रतिबिंब असे प्रमाण का धरि त्यास। जाइल सेवटी। भल भला जाइल सेवटी कां भूल पडली अतांची ॥ ३ ॥ महाकारण देहाचें शोधन करीं शिष्यराया। अर्ध मातृका चौथि अवस्था नाम कीं रे तूर्या। नीळ सुनीळ प्रभा तयाची मसूर सुकाया। चिद्गगनीं चित्स्वरुपा भासे परि हे निज माया। प्रतिबिंबाचे प्रमाण काय अंतर शोधावे। बिंब तें खरे करुनि घ्यावे। गुरुला शरण रिघावे। भाव धर मनी। भल भला भाव धर मनी गुरुकिल्ली ॥ ४ ॥ अतिकारण तें अति अवकाशें उन्मनि पांचवी। दशम द्वार गुरु साचार म्हणती सत्रावी। स्थूल देहाचो येथुनि सरली सगुणाची पदवी। निर्गुण निश्चळ निर्मळ प्राण्या त्या पदिं ला पावी। वस्तु वेगळी अलक्ष्य सगळी गुरुची हातोटी। पाहे तें सर्वा सेवटी *मध्वनाथा खुण उलटी। ज्ञान देखणी भल भला, ज्ञान देखणी जेथ देह विरली। अतांची साधन साध्य करुन घे निज वस्तु अपुली ॥ ५ ॥

* हें मध्वनाथाचें नांव असलेलें पद ह्यांत कसें ? (सं.)

## १०६ अभंग.

म्हणुनि भीत नाहीं भीत नाहीं । भेदाचि गिळिला पाहीं ॥धृ०॥ हरि गुरु तारक असतां । ज्याची अखंडित चित्सता ॥ १ ॥ चिद्विलास प्रपंच सारा । माया भव गज अनृत पसारा ॥ २ ॥ ज्याच्या आदीं अंतीं ब्रम्ह । देशिक कृपें बोधिलें वर्म ॥ ३ ॥ माया सत्य असा भ्रमलों कीं । मायाधव **माधव** मी अवलोकीं ॥ ४ ॥

## १०७ पद.

आत्मवस्तु मज लागलीसे गोड । पुरविले श्रीगुरुरायें कोड ॥ धृ० ॥ ऐसें असतां अज्ञापि संपत्ती तें । नेघे म्हणतां वळेंचि दिल्हें मातें ॥ १ ॥ संपति मदें अंतरतीं तुझे पाय । ऐसें म्हणतां कृपेनें धरिली बाहे ॥ २ ॥ वरद करें मूर्ध्निसी स्पर्श केला । अखंडित सांभाळीन वदला तुला ॥ ३ ॥ अभय असतां या काळीं काय जालें । माय बापा सांभळीं विरद आपुले ॥ ४ ॥ धांवे पावे श्रीगुरुराया आतां । विनवितो चरण ठेउनी माथा ॥ धृ० ॥ लाज राखी दासाची देवराया । शरणागत **माधव** तुझ्या पाया ॥ ५ ॥

## १०८ अभंग.

नाहीं नाहीं संत, नाहीं नाहीं देव । आयिसा हा भाव, वाटे जगा ॥ १ ॥ सांडितील भक्ति, सांडिती विरक्ती । नास्तिकाचे पंक्ति, बैसो पाहती ॥ २ ॥ या लागी तूं बा, विरदा सांभाळावे । नातरीं स्वभावें,

कांग बोल ॥ ३ ॥ धांवलासी मागें, भक्ताचे संकटी । आतां जगजेठा, काय जालें ॥ ४ ॥ धांवे धांवे आतां, होतो उपहास । तूज जग हांसे, ऐंसे न करीं ॥ ५ ॥ अपराध राशी, केल्या जरि देवा । तरि त्वां **माधवा** नुपेक्षावे ॥ ६ ॥

---

## १०९ अष्टपदी.

हरिमेकर संमुनि जनमानस हंसं । गुरुचरणांबुज सेवन तत्पर लब्धमुदारविकाशम् ॥ धृ० ॥ सोहं बोधित शब्दनिरंजनसर्वग शाश्वत पूर्ण । पवन विद्युत वनमंडलमिवजव मायाभवन विशीर्णं ॥ २ ॥ गोपी गति मुख लसित मनोहर श्यामल मृदुल शरीरं । वेणु स्वनित धवलेन्दु मनोभव सुरभित कुंजकुटीरं ॥ ३ ॥ गोप नंदनानंद कंद व्रज वृंद विभूषितशीलं । कर धृत गिरिवर विस्मित सुरवर दर्शित सुख कर लीलं ॥ ४ ॥ वृष्णि सरोज विकाशक दिनकर हिमकरवंशनिधानं । प्रश्नि तपः परितोषित शौरिज अज धृतमानुपमानं ॥ ५ ॥ दश विध विग्रह प्रकटित श्रीपति निहत मुराहितकंसं । धर्म तनुज कृत पालन तत्पर चैद्य प्रभृति विध्वंसम् ॥ ६ ॥ शुक सनकादिकरींद्रं जनकनुत चरण सरोरुहसारं । गणिकाजामिल द्रुपदसुता ध्रुव भिल्ल वधू हतभारं ॥ ७ ॥ स्थिर चर व्यापक श्रुतिवय वर्णित मवटित रचना धारं । देशिक कृपया पश्यति **माधव** इह हृदि सततमपारं ॥ ८ ॥

---

## ११० पद.

सच्चित्सुख पूर्णानंद गोविंद ॥ ध्रु० ॥ वृंदारक मुनिवृंदानंदित वंदित विद्वज्जन श्रुति वंद्यं ॥ १ ॥ भर्वशतक्रतुशार्विकृत स्तुति सर्वात्मक निष्कल निर्द्वंद्वम् ॥ २ ॥ वंदे कंदममंदफलप्रद वृष्णिकुलोद्भव माधव माद्यं ॥ ३ ॥

## १११ पद.

माझ्या जीवाचें जीवन, तो हा नंदाचा नंदन । निष्कल निर्गुण तेहें सांवळे सगुण ॥ भय जनाचे वर्जुन पाहुं भुकेले हें नयन । मुरलीच्या नादें बाई वेधले कीं तनुमन ॥ १ ॥ सासु सासऱ्याच्या भयें राहसी संसारी गुंतून । सुखें जन हें निंदो परि मी जात तुज टाकून ॥ लौकिकाची शंका दिधली सर्वही सोडून । वेगि पवनें चरण गति मनें मिळाले मी धाऊन ॥ २ ॥ हरि रूप मीं जालें आतां स्वइच्छें क्रीडेन । गंगा मीनली सागरीं पुढती मिळती ते मिळोन ॥ त्या रंगी रंगुन उरलें भक्तीस्तव संपूर्ण । नृत्य गीत विनोदें कुंजीं माधव संगी विचरेन ॥ ३ ॥

## ११२ पद.

हरि पावे स्मरणें रे तुज काय उणें ॥ ध्रु०॥ गज गणिका अजामिळ ध्रुव बाळक द्रुपदसुतादिकां करुणे ॥ १ ॥ चाळक हा हृदयीं

प्रतिपाळक जाणुनि त्या संनिध करणे ॥ २ ॥ श्रवण मनन निदिध्यासन करितां या स्वानंदपदा वरणे ॥ ३ ॥ गुरुकृपें माधव भजनी रतला भवनिधि तरला याचि गुणें ॥ ४ ॥

---

## ११३ अभंग.

---

केशव नारायण गोविंद, विष्णु मधुसूदन मुकुंद ॥ १ ॥ त्रिविक्रम वामन श्रीधर, हृषीकेश दामोदर ॥ २ ॥ पद्मनाभ संकर्षण, वासुदेव श्रीप्रद्युम्न ॥ ३ ॥ अनिरुद्ध पुरुषोत्तम, अधोक्षज हरेराम ॥ ४ ॥ नृसिंह अच्युत जनार्दन, उपेंद्र माधव श्रीकृष्ण ॥ ५ ॥

---

## ११४ पद.

---

रामकृष्ण वासुदेव हरि हरि करुणा । केशव यादव वामन श्रीधर देवकीनंदन श्रीमुरलीधर ॥धृ०॥ चिद्घन गोविंद विष्णो नरहरे गोपीनाथ। नारायण श्री माधव दीनानाथ ॥ १ ॥

---

## ११५ पद.

---

गिरिधर नागर श्रीधर सुंदर नरहर मनुजा ध्यांई ॥ धृ० ॥ केशव यादव वामन विष्णो हरि कृष्ण गोपाल गदाधर रत तूं माधव पाइ ॥१॥

---

## ११६ संस्कृत नामावळी.

श्रीगुरु कृष्ण गोपाळ गोपीरमण कंस चाणूर दमन दीनजनपालन ॥ध्रृ०॥ द्वारकानाथ गोविंद गदाधर गरुडासन विभो कमलापते ॥ १ ॥ गोकुळानंद योगेश रमारमण करुणाकर हरे जगदुद्धरण । नारायणानंद कंसासुरकंदन कमलासन जनक श्रीमाधव ॥ २ ॥

## ११७ पद.

अच्युत श्रीकृष्ण गोविंद दीनानाथ हृषिकेष विष्णु वासुदेव जगज्जीवन जगदुद्धर नारायण नरहरे नंदनंदन ॥ ध्रृ०॥ दामोदर दीनबंधो दनुजारे मुकुंद विश्वेश्वर रामचन्द्र केशव मधुसूदन ॥ २ ॥ भगवान भूतेश पद्मनाभ कमलापते हे गोवर्द्धनधरण कालियमर्दन ॥ ३ ॥ गदाधर गदाग्रज कामदेव कामपाळ गोकुळेश गोपाळ कंसारे सुरेश माधव गरुडध्वज करुणाकर जनार्दन ॥ ४ ॥

## ११८ पद.

नटवर वपु हे सुंदर श्याम गावूंगे कृष्णनाम ॥ ध्रृ० ॥ किरिट कुंडलें भाळीं कस्तुरी सुललित कांती मनोभिराम ॥ १ ॥ श्रीवत्स कौस्तुभ शोभित कंठीं वनमाळी श्रीआत्माराम ॥ २ ॥ कटि पीतांबर क्षुद्र घंटिका हरि मुरलीधर मेघश्याम ॥ ३ ॥ तोडर वाकीं रुण झुण चरणीं परम वरद माधव सुखधाम ॥ ४ ॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६८०

## ११९ अभंग.

कृष्णमय जाली वृत्ति, कृष्ण मय सदा स्थिति ॥ १ ॥ नित्य आसनी भोजनी, कृष्ण दिसे निज नयनीं ॥ २ ॥ ऐसें श्रीगुरुकृपें जालें, सहजें माधवा फावलें ॥ ३ ॥

## १२० अभंग.

नाम चिंतूं नामगा ध्याऊं, रुप ध्याऊनि रूप पाहूं ॥ १ ॥ प्रेमें पायासी वंदन, दृढ देऊं आलिंगन ॥ २ ॥ करूं देवासी भाषण, जेणें होय समाधान ॥ ३ ॥ माझें मीपण देवा वेई, तुझें माधव पण मज देई ॥ ४ ॥

## १२१ पद.

यशोदा वदते गोपा जोडुनि पाणी ॥ धृ० ॥ सर्वांची गोधनें बाळहि असता गिरि हरिच्याची पाणी ॥ १ ॥ अति सुकुमार कृष्ण हा माझा जड पर्वत वर वर्षत पाणी ॥ २ ॥ सकळ मिळोनीं सहाय व्हा माधवा, उसणा काय चक्रपाणी ॥ ३ ॥

## १२२ अभंग.

ध्यानी मनी ध्यावा राम, जेणें वृत्तिसी विश्राम ॥ १ ॥ श्रवणी कथेचें श्रवण, वाचे गावे त्याचे गुण ॥ २ ॥ स्वरूप पाहावे लोचनी, कर योजावे पूजनी ॥ ३ ॥ ऐसी सर्वांही करणे, रामपरचीकरणें ॥ ४ ॥ विजयाची विजय मूर्ती, नित्य **माधवाचे** चित्तीं ॥ ५ ॥

## १२३ अभंग.

गुरु गोविंद मनीं ध्यावा, हृदयीं लक्षुनियां गावा ॥ १ ॥ कीजे साष्टांगें नमन, करें करावे पूजन ॥ २ ॥ गुण ऐकावे श्रवणीं, रूप पाहावे लोचनीं ॥ ३ ॥ चरणें गणी देवाळया, लोटांगणीं योजी काया ॥ ४ ॥ नवविध भक्तिभावें, प्रेमें **माधवा** भजावे ॥ ५ ॥

## १२४ पद.

श्रीहरिविण मला गे बाई लव पळ क्षण करमेना ॥ धृ० ॥ सत्वर जाउनि लागे तूं चरणी प्रार्थुनिया आणी त्या जगज्जीवना ॥ १ ॥ निकट हरितें बोले गोपी अति उत्कंठित राधा तव शरणा । ऐकतांचि **माधव** राधे संनिध परम प्रीति करुनिया देत आलिंगना ॥ २ ॥

## १२५ पद.

अहो बाई मुरली नादें मनमोहन मन मोहिल करूं मी काये ॥ धृ० ॥ किरीट कुंडलें सुललित कांती कटिं पीतांबर लसती नुपुरें पाये ॥ १ ॥ कंज नेत्र हे भाळीं कस्तुरी सुंदर अधरीं मुरली सुस्वरें गाये ॥ २ ॥ निशिदिन हृदया हृदय मेळउनि आलिंगिन मी प्रेमें **माधवराये** ॥ ३ ॥

## १२६ पद.

नंदनंदन सये निरखिला नयनीं, किरीट सुशोभित कुंडलें श्रवणीं ॥धृ०॥ मंद स्मित मुख सुललित कांती, कौस्तुभ कंठें शोभवि किरणीं ॥ १ ॥ लोलक वनमाळा शोभे पीत वसन कटिं नूपुरें चरणीं ॥ २ ॥ शिव सनकादिक स्तविती ज्यातें तो **माधव** यशोमतिचे सदनीं ॥ ३ ॥

## १२७ पद.

हरि विण कोण पालक भवजलतारक तुजलारे प्राणिया ॥धृ०॥ होईस होई सतत या चरणीं रत शिव सनकादिक ध्याती ध्यानिया ॥१॥ श्रीधर श्रीकर नाम निरंतर गातो मुनिवर ज्ञानिया ॥ २ ॥ नर नारायण केशव **माधव** वामन वद वद सुयुक्ति मानि या ॥ ३ ॥

## १२८ पद.

कृष्ण तुझा अंगे बाई आम्हांसी छळितो हा कीं ।।धृ०।। जें गृह कृत्यें करु जातां तैं दधि भाजन फोडुनि टाकी ॥ १ ॥ वर्जि हरीला विणवणी तुजला म्हण तरी आम्हीं यशोदे जा कीं ॥ २ ॥ म्हणे **माधवा** ना छळीं यातें वदति मृषाया पुस रामा कीं ॥ ३ ॥

## १२९ पद.

अरे हरि माझी करुणा तुजविण कोण करीरे ।।धृ०।। दुष्टसभेंत दुःशासन दुष्ट हा वोढित वसन करींरे ॥ १ ॥ अनाथनाथा दीन बंधु गिरिधर ये लवकरिरे ॥ २ ॥ किर्ति तुझी जगिं विस्तृत **माधवा** पशुहि तारिला करिरे ॥ ३ ॥

## १३० पद.

निपट कपटी कृष्ण उद्धवारे । तूं न हे जाणसि त्याच चरित न कळे सुरवर नरां आहे मायावी ॥ धृ० ॥ कोटि वचन वद सामपर बोले त्याचे न साचे जाणे म्हणतो, क्रीडत फिरत गृह गृह मन्मथासि वश कुब्ज्या संग रंग ढंग करितो असो भावी ॥ १ ॥ वट वटीं व्याप्त ईश पटीं तंतु जेंवि, ईश्वरीनीध वचन नवद मूर्ति ध्यावी । राहे श्रीवर विचित्र छत्रपती कीं । योगेशम आम्हां ज्ञान बोधी स्थिर मोह न निवारत । मन धावत मन **माधवा** सोडित आम्हीं व्यतिक्रम करुनि कीर्ति गावी ॥ २ ॥

## १३१ पद.

वेगि घेउनि या हरिला गे ॥ धृ० ॥ अति सुंदर प्रिय पुरंदर, धृतमंदर कंबुकधर, जगदुद्धर भक्त सादर, दामोदर विनवा गे ॥ १ ॥ श्रीमाधव तो बहुत विलासी नटवर वपु जो कामतात। गोधनें घेउनि फिरतो छंदें कमलानन तो कमलाकांत। अशन शयन न रुचे त्या विण कानन जाउनि कानी सांगे ॥ २ ॥

## १३२ पद.

पुसुनी नंदा नंदनंदन मथुरे आले टाळुनि कृष्ण ॥ धृ० ॥ वस्त्र घेतली रजक वधूनें लेववि नायक परमकार्ष्ण ॥ १ ॥ कुब्जा अंग राग करि अर्पण मालाकारा करि वितृष्ण । धनुर्भंग त्वरित करुन विजयी जाले रामकृष्ण ॥ २ ॥

## १३३ पद. (पंढरी वर्णन).

वस्ति सच्चित्स्वानंद सुखराशी वो । पूर्णब्रम्ह व्यापक सर्व देशीं ॥ धृ० ॥ पांढरि वरि हे काळि वसे कैशी वो । पैल पाहा हे पंढरी ऐसी ॥ १ ॥ अलय आवर्त्त शुद्ध तेथें राहे वो । पांडुरंग चैतन्य साक्षी आहे ॥ २ ॥ औट हाताचि खालिं आहे ईटवो । वरि पाहा हा पांडुरंग नीट ॥ ३ ॥ स्वयंतेजें जो कां सदोदीत वो । तोचि

व्यष्टी समष्टि अखंडित ॥ ४ ॥ हृदय संपुटी सोहं पुंडलीक वो। आत्मा विठ्ठल तिष्टतो देख ॥ ५ ॥ चंद्रभागा हे पूर्ण अमृतलाभा हो। वरी सूर्यकिरणेसि भासे आभा ॥ ६ ॥ धारणेसी मारुती लक्ष लावी वो। खगराज खं मध्ये तेज दावी ॥ ७ ॥ ऐसी पंढरी हे अलौकिक वो। कालत्रय अबाध्य नित्य एक ॥ ८ ॥ गुरुकृपें मी पंढरी ये गेलो वो। आत्मा विठ्ठल माधव जाळो ॥ ९ ॥

---

## १३४ पद.

निळ शामल अति सुललित कांती, ते हे विटेवरी सुंदर मूर्ति ॥धृ०॥ समपद कटि कर ठेउनि उभा। कंधरि तुळशी शोभवि शोभा ॥ १ ॥ सदय धवळ हा सरसिज नेत्र। चिंतित माधव नित्य पवित्र ॥ २ ॥

---

## १३५ पद.

मना पंढरीस जाऊंरे। आत्मा विठ्ठल हा पाहूंरे ॥ धृ० ॥ सम चरण विटेवरीरे। तेथें सम भाव धरीरे ॥ १ ॥ कटीं कर ठेउनि उभारे। भेटी भक्ताचिया लोभा ॥ २ ॥ तुळसी वैजयंती गळा, दृष्टि नासाग्रीं निर्मळा ॥ ३ ॥ किरिट कुंडलाची कांती। मुखीं स्वरूपाची दीप्ति ॥४॥ उभारुनी दृढप बाहीं। त्यातें धरावे हृदयीं ॥ ५ ॥ संतसमागमी राहूं। सखा माधव हा गाऊं ॥ ६ ॥

---

## १३६ पद.

पहाते पाहणे पहा विठ्ठला, जरि श्रीगुरुप्रसाद जाला ॥ धृ० ॥ विठ्ठल नोहे येक देशीं, व्याप्त व्यापक सर्वदेशीं ॥ १ ॥ अखंडित सोहं ध्यासे, अंतर्बाह्य विठ्ठल दिसे ॥ २ ॥ मग तूं केशव **माधव**, हाची प्रीतिती ठाव ॥ ३ ॥

## १३७ पद.

चला चला हरिजन हो हरिदिनि पंढरिची यात्रा । वाजत गाजत नाचत पाहूं पंकजदल नेत्रा ॥ धृ० ॥ विठ्ठल विठ्ठल केशव यादव गाऊं या मंत्रा । कटिकर नटवर भेटुनि त्यातें सुख देऊं गात्रा ॥ १ ॥ सुगंध सुमनें बुक्का वाहूं तुळसी नवपत्रा । श्रीपद पद्मा वंदन करुनि तारूं कुळ गोत्रा ॥ २ ॥ महाभागा चंद्रभागा निर्मळ सुपवित्रा । तत्तिरिं साधु वैष्णव गाती **माधव** चरित्रा ॥ ३ ॥

## १३८ पद. ( गंगा वर्णन ).

गंगास्नानें पानें शुचि हो सावध । पाप ताप दैन्य लया जाती हो सावध ॥ धृ० ॥ धर्म अर्थ काम श्रुति हो सावध । निज वृत्ति लावी आत्मस्थिति हो सावध ॥ १ ॥ सोडिं सोडिं विषयाची प्रीति हो सावध । ज्याच्या योगें पावे यातायाती हो सावध ॥ २ ॥ धरिं

धरिं सद्गुरुची आवडि हो सावध । ज्याच्या संगें निजानंद तोडी हो सावध ॥ ३ ॥ गंगा यमुना सरस्वती हो सावध । प्रयाग **माधव** त्रिवेणी ध्यावी हो सावध ॥ ४ ॥

## १३९ पद.

पावन परम पवित्र गंगे दर्शन मात्रें । विनविसी तूं अष्टांगें स्नानें पाप ताप हरी चित्र गंगे ॥ १ ॥ तव नामें जपतां जे वक्त्रीं करिसी त्यां धन्य पवित्र ॥ २ ॥ कालिंदी तं काल सहोदरि उद्धरिसी अरि- मित्र ॥ ३ ॥ तम रिपु पुत्री **माधव** मैत्री नुत ब्रम्हादि गिरित्र ॥ ४ ॥

## १४० पद.

विष्णु पदोद्भवा वंदा गंगा त्रिभुवन पातक भंगा । अंतरंगा शक्ति हरीची आवड जे श्रीरंगा ॥ धृ० ॥ दैत्य बलि बलियाग प्रसंगीं, वामन पद विधि लोकां । गेला तंई हें प्रकटी स्वर्द्धुनि तारण त्रिधि लोका ॥ १ ॥ महद्विभुपदीं रज समुदाय होते जे सादर । प्रवाह संगें आले वंधू मानीं त्या सोदर ॥ २ ॥ स्नाना पाना येती जे जन आधीं रज अवनाशीं । मंदाकिनी मन निर्मळ करुनी मिळवी चिद्घनांसी ॥ ३ ॥ बंधूवर्य आर्य करिती शौर्य वाणी । सरंग तरंग हस्तें भेटे वर्णी देव वाणी ॥ ४ ॥ उदक रूपिणी दिसे परि हे वेदामृत सौभाग्य । हरिहर- रूप होती स्नानें ज्याचे पूर्ण भाग्य ॥ ५ ॥ नारायणें अमृत हे केलें स्वर्गच्युत । **माधव** करुणाकर स्वभक्तां देतो पद अच्युत ॥ ६ ॥

## १४१ पद. (ख्याल)

अहो बाई लवपळ क्षण कीं त्याविण मजला न गमे सये करु मी काय ॥ धृ० ॥ चाल सखे ठाण देहुडे पाहुं **माधव** सुंदर पाय ॥१॥

## १४२ पद.

कोणी हरिला याग घेउनि त्याविण न गमे सये बाई या मज दिन रजनी ॥ धृ० ॥ गर्वे हे जनवाक्य छले रुसविले केशवा । दीन मी लागे **माधव** चरणीं ॥ १ ॥

## १४३ पद.

शामसुंदर रूप पाहुनि वेधलें मन ॥ धृ० ॥ मीं **माधव** संगें रतलें बाई । मुखें निद्रोहे जन अगे वेधलें मन ॥ २ ॥

## १४४ पद.

ऐसा कां रे हरी तूं करीतोसि रे राधेसी छल ॥ धृ० ॥ खोडी तूं न करी कृष्णा । सांगो किती काय म्हणे **माधवा** माय ॥ १ ॥

## १४५ पद.

हरिविण गे बाई माझे मन न राहे क्षणभरी ॥ धृ० ॥ जईंहुनि निरखिला **माधव** नयनीं ध्यान अंतरीं न स्थिर राहे क्षणभरी ॥ १ ॥

## १४६ पद.

अरे मन हरि पदिं धरि तूं प्रीति सज्जन संग करीं। हेंचि तुझें निजहित ॥ धृ० ॥ सुंदर श्याम मनमोहन रूप । होई त्या चरणीं रत । जो चरांत अचरांत **माधव** । स्वात्मरंगिं रंगवि तूं चित्त ॥ १ ॥

## १४७ पद.

सांवळें सुंदर रूप पाहुनि हे माझें मन वेधलेंग बाई ॥ धृ० ॥ त्रिभंगी देहुडे ठाण विलसे **माधवाचे** गुण वाणुं मी कांई ॥ १ ॥

## १४८ पद.

हरिगुण श्रवण करा । सकळ ही हा भ्रम विसरा ॥ धृ० ॥ दुर्लभ नरतनु पाउनी अवचट मननें करुनी तरा ॥ १ ॥ दुस्तर संसृति सागर तरणीं प्लव गुरुचे रण धरा ॥ २ ॥ व्यापक जो सकळांच्या हृदयीं मानसीं ध्यान करा ॥ ३ ॥ जड मूढ तारक **माधव** गुरु विण आन नसे दुसरा ॥ ४ ॥

## १४९ पद.

कोण्ही कांहीं तरी सांगावो या हरिला गे बाई ॥ धृ० ॥ बळेंचि येउनि गळा पडुनिया झोंबतसे मज अंगा ॥ १ ॥ राहे माझी कुळ स्थिति हे या पासीं मागा । **माधव** चेटक मम गृहीं येउनी नित्य वरितसे थांगा ॥ २ ॥

## १५० पद.

या हरिला कोणी तरी सांगा या हरिला ॥ धृ० ॥ गुरुजन अवघे निकटचि असतां बळचि झोंबत अंगा ॥ १ ॥ निशिदिनि याला वर्जित असता सोडिचना हा थांगा ॥ २ ॥ घरोघरीं जननी दान करी माधव प्रभुतें मागा ॥ ३ ॥

## १५१ पद.

हरि म्हणें काय उणेरे प्राणिया प्राणिया ॥ धृ० ॥ दुर्लभ नरतनु प्राप्त असे तुज सावध सर्व ही करणें करणे ॥ १ ॥ दृढतर निश्चयें माधव चरणी बिंदुवत् भवसिंधु तरणे तरणे ॥ २ ॥

## १५२ पद.

योजुनिया देवा निज अंत:पुरी । चरण श्रृंगाराची आज्ञा केली ॥ १ ॥ ऐसी हे चाकरी यथामती केली । चूक काय जाली न कळे मज ॥ २ ॥ आपुले जाणुनी केला अंगिकार । मज हा अव्हेर युक्त नसे ॥ ३ ॥ थोराचा हा गुण करतो क्षमा जाण । माधव शरण तुज देवा ॥ ४ ॥

## १५३ पद.

दैत्यविदारण भवभयभंजन नरहरि कांहो जाला। उद्भव स्थिति लय कर्ता श्रीहरि अघटित काय तयाला ॥ धृ० ॥ कैटभ मधु वध करितां श्री विष्णु न धरी रूप भिन्न। स्वशत्रु अमित असुर वधिले न करी अंत्र छिन्न ॥ १ ॥ स्वभक्तातें तातें पीडिता तीव्र कोप जाला। सदेह शत्रु ग्रासिन म्हणुनि योजी हरिरूपाला ॥ २ ॥ मदन्य ईश्वर आहे म्हणसी कोठे मंदा सांग। सर्वत्र व्यापक विष्णु म्हणतां पुत्र पित्या आला राग ॥ ३ ॥ सर्वत्र तरि कां स्तंभीं न दिसे दिसे म्हणे प्रल्हाद। सखड्ग मुष्टि हाणिता स्तंभा जाला महा निहद्री ॥ ४ ॥ भृत्य वाक्य स्वकीय व्याप्ती दोन्ही सत्य कराया। सत्वर प्रकटे श्रीहरि म्हणुनी राहे पूर्व काया ॥ ५ ॥ हिरण्यकशिपु स्वदास रिपु मारुनि अंत्र विदारी। पूर्व रूपें कृत्य हें अयोग्य म्हणुनि हरि मुख शौरी ॥ ६ ॥ लीला विग्रह प्रभु त्या आग्रह भक्तरक्षणाचा। स्वदेहाहुनि प्रिय दास पक्षपात त्याचा ॥ ७ ॥ भक्ति महिमा प्रकटावया जाला नरकेशरी। अद्भुत **माधवा** उपमा पहातां कांहीं नटकेसरी ॥ ८ ॥

## १५४ पद.

अहो कृष्ण रूपा ध्यावें गावें पुजावे निर्मळा ॥ धृ० ॥ मस्तकीं मुकुट श्रवणीं कुंडल कंठीं कौस्तुभमाळा। भाळीं तिलक अधरीं वेणु पहावें या वननीळा ॥ १ ॥ कटि पीतांबर नटवर वपु हे चरणी तोडर ल्याला। वृंदारण्यी विहरत **माधव** घेउनि सह गोपाळा ॥ २ ॥

## १५५ पद.

अहो हे श्रीहरीचे रूप मना भावतें भावते ॥धृ० ॥ व्रजभूमी वरी गोधन संगें लुटु लुटु झटपट धावते धावते ॥ १ ॥ तोडर वाकी रुणुझुणु चरणीं सुस्मितेंचे टक लाविते लाविते ॥ २ ॥ नित्य निरामय माधव रूप हे कौतुकां कौतुक दाविते दाविते ॥ ३ ॥

## १५६ पद.

हरि तुझे नाम भय हे निवारी सदा ॥ धृ० ॥ तातें पीडिता प्रल्हादासी संकटीं स्मरण करी ॥ १ ॥ प्रेम भरे हरि धाउनि आला आयुधें नसतां करी ॥ २ ॥ सांकडे भक्ताचे साहवे ना स्तंभीं प्रकटे री । तांतडी दैत्याचे हननास्तव नर अर्धा केसरी ॥ ३ ॥ तेच क्षणीं नेआयुध सारुनी धाउनि असुरा धरी । दुष्ट कर्म दुष्टाचे पाहुनी क्रोधें उदर चिरी ॥ ४ ॥ भक्तवत्सल माधव प्रभु ऐसा करुणा निधिलहरी । प्रल्हादासी कुरवाळुनिया तोषवी वरद करीं ॥ ५ ॥

## १५७ पद-षोडशांग.

अजमव्ययं निष्कलं शाश्वतं श्रुति गीतं निरंतरंयत् ध्यायासि निजजन ॥ धृ० ॥ बिबीकरश्मे श्रीकृष्णरावबृंदावन । किं गश्तवाल ऐतस्बीरओचिमर्दुचि जन ॥ १ ॥ सीस मुकुट पीतांबर सोहत मंद-हास सों मोहन ॥ २ ॥ तो गोविंद गोपाल गदाधर गरुडासन मुकुंद मधु सूदन श्रीमाधव सर्वाचे निजधन ॥ ३ ॥

## १५८ पद.

हरि जेथें तेथें दाटला ॥ धृ० ॥ हृदय संपुटी सोहंपुंबोधें, श्रीगुरुकृपें गाठला ॥ १ ॥ सच्चिदानंद हा अनुभव होता, भव सिंधु सहजची आटला ॥ २ ॥ जन्मार्जीत हे संचित सर्वही, सुकृत दुष्कृते पट फाटला ॥ ३ ॥ अम्हांस्मि बोधें **माधव** पूर्ण हा, स्वानंदें स्वानंदी सांठला ॥ ४ ॥

## १५९ पद.

हरिगुण गाईरे प्राणियां तूं ॥ धृ० ॥ वाणिचे सार्थक हेचि असे जना, तन्मय होउनि राही ॥ १ ॥ सावध होउनि योजी तूं मना, सादर **माधव** पाई ॥ २ ॥

## १६० पद.

हरि तुझी माया हेंचि बरी ॥ धृ० ॥ वत्सें वत्सप होउनि तूं व्रजिं ब्रम्हया आणिसी हारी । गो गोपीचें प्राशुनिया पय लीळा करि शिखरी ॥ १ ॥ रासमंडली प्रति गोपीसी क्रीडसीं धरुनि करीं । सस्मित होतां तन्मय गोपी मोहिसी त्या कुसरीं ॥ २ ॥ मृत्तिका भक्षितां दापि यशोदा तें म्हणे मुख पसरी । ते समयीं विश्व दावुनि आननी मिरविली सुख नगरी ॥ ३ ॥ मायाश्रित जन निंदति ईते भक्त हेचि तरी । कर्णधार तूं नित्यचि **माधव** तारी दयाळहरी ॥ ४ ॥

## १६१ श्लोक—संमत सांगताचे.

मायावर्णयतोमुष्य ईश्वरस्यानु मोदतः । शृण्वतः श्रद्ध धानस्य मायघात्मानमुह्यनी ॥ १ ॥

## १६२ अभंग-रवळनाथ स्वामीचें वर्णन.

कृपावंता नाथा, अनाथा माउली । कृपेची साउली, करी मज ॥धृ०॥
भक्त संरक्षणा, आयुधें धरीसी । खड्ग शूळें करिशी, दुष्ट नाशा ॥ १ ॥
तुरंग वाहना, शत्रुनिर्बर्हणा । रण दीक्षित राणा, स्वामी माझा ॥ २ ॥
भक्ता लागीं देवा, धरी करीं पात्र । डमरु स्वरें सूत्रें, उपदेशी ॥ ३ ॥
**माधवाचें** निज, कुळ हे दैवत । करी प्रणिपात, अखंडित ॥ ४ ॥

## १६३ पद.

हरिला कोणी आणागे ॥ धृ० ॥ निसिदिनि भुवनी सांगु मी कोणागे सये । रतिपति हरि माझा स्वामी आणागे सये ॥ १ ॥

## १६४ पद.

तनु रत्नागिरि हे आत्मा जोती रूप स्वयें ॥धृ०॥ सन्निधि हे निज मूळ शक्ती, त्रिगुणात्मक शिव सहजची युक्ती ॥ १ ॥ अहं मर्दुनी विजई निज मुक्ती तो हा **माधवि** पूर्णभक्ती ॥ २ ॥

## १६५ पद.

आज गिरधारी संगें रतले हें चित्त माझें, जनासी ही मी न लाजे पुरो काज मनिचें । सासू आणि सासराही जावा आणि नंदा त्याही, निंदा ही करोतु कांहीं भय नाहीं जनिचें ॥ घालीन मी गळां बाहीं स्वछंदें नाचेन पाही, मेळवीन हृदयासी कृष्णरूप धनिचें । मी तव माधव संगें रंगलें कीं त्यासी रंगें, सुख भोगी अंग अंगें नित्य वृंदावनिचे ॥ १ ॥ रुक्मिणी म्हणे सुदेवा विनती तूं वासुदेवा, सांगे मम मनोभावा देव देवा हरीतें । तूं त्रैलोक्यैक सुंदर गुणालय दामोदर, या लागीं मनसादर निःसंकोच वरीतें ॥ कळतां तन्मनोरथ केला कृष्णें सज्ज रथ, अरि करून विरथ रथ, रथीं घे नवरीतें । लाधली श्रीरमाधव नित्य अच्युत माधव, पुरी आले सबांधव कोण करी सरीतें ॥ २ ॥ जगन्नाथा जगद्बंधु कृपा कर कृपासिंधु, पांडवाच्या दुष्ट बंधु दुष्ट कर्मा आचरे । वस्त्रें वोढी दुःशासन करीं या दुष्ट शासन, ऐकतां गरुडासन सभास्थानी संचरे ॥ करुनि हस्त अनंत वस्त्रें पुरवी अनंत, आश्चर्य मानी अनंत जे रक्षणां वीचरे । म्हणे द्रोण गंगासुत हा माधव पार्थसुत, धिगधिग अंध सुत धन्य धन्य पंचरे ॥ ३ ॥

# श्रीकृष्णजन्म ।

## श्लोक.

अजन्मा जन्मा या व्रजपति घरीं हेतु विवरा । वरा भुक्ती मुक्ती सफलित करा कर्ण विवरा ॥ वरा मागे द्रोणा सहित वनिता श्रीकर वरा । वरा तूझी भक्ती करिन सुत नेई सुरवरा ॥ १ ॥

## श्लोक.

तथास्तु ऐसें वदला तयाला । दानी महा उत्सह दा तयाला ॥ सो द्रोण जाला मग गोप नंद । सुपुत्र श्रीकृष्ण करी अनंद ॥ १ ॥

## ओवी.

सकळ मंगळाचे जन्मस्थान । तो पुत्र जाला नारायण । नंद यशोदा भाग्य पूर्ण । उदया आले स्वभावें ॥ १ ॥ प्राप्त होतां ब्राह्म्य मुहूर्त । यशोदा जागृत होउनी पाहत ॥ पुढें बाल देखिलें अद्भुत । आनंद पोटीं न समाय ॥ २ ॥ अति हर्षे जाणविले नंदा । तो हीं पावला परमानंदा । पाचारुनी विप्रवृंदा । मंगल स्नानातें केले ॥ ३ ॥

## श्लोक.

ज्या कारणें लाविति योगमुद्रा । मानी शिशू नंद दयासमुद्रा ॥ घेऊनिया क्षौद्र सुवर्ण मुद्रा । घाली मुखीं नेणुनि देवमुद्रा ॥ १ ॥ गोकुलांत पतिच्या पदपद्मा । सेवनार्थ तई राहत पद्मा ॥ कल्पवृक्ष घरी पादप होती । इंदिराच व्रज रूप अहो ती ॥ २ ॥ घरोघरीं शोभति गोपगोरी । तथापि श्रीकृष्ण महात्म्य गोरी ॥ तें तत्व माझें न कळो जनाला । जो सज्यना मातुल भंजनाला ॥ ३ ॥

## पद.

धन्य व्रजमहिमा व्रजमहिमा । राहे पति सह महिमा ॥ धृ० ॥ स्वामी कमळजन्मा । ज्या स्थळिं वांछित सादर जन्मा ॥ १ ॥ हरि पद अंघ्रिं पथगा । पाहतां पदोपदीं त्रिपथगा ॥ २ ॥ ज्या वनीं पाद प्रस्तर, दर्शनें तारिति भव नदी दुस्तर ॥ ३ ॥ माधव हरि पद कमला । वंदुनि वृंदावनिया रमला ॥ ४ ॥

## ओवी.

सदनी प्रवेशुनी त्वरित । मधु संस्कार करी विधि युक्त ॥ अनेक गोप्रदाने देत । ब्राम्हणा लागीं ते काळीं ॥ १ ॥ गुढिया तोरणें मंदिरीं । यथाक्रमे अति साजिरीं ॥ लाउनी त्राहाटिल्या भेरी । नाद अंबरीं कोंदला ॥ २ ॥

## पद-भैरवी.

पुत्रानंदें नंद सुशोभित ॥ धृ० ॥ मग वाद्य भेरी वाजत, गुढिया तोरणे द्वारीं उभ रित ॥ १ ॥ ब्राम्हण मंगल स्नाना करवित, मधु संस्कारा करि विधि युक्त ॥ २ ॥ सुवासिनी मंगल द्रव्या देत, यशोदे भाग्य गीत गात ॥ ३ ॥ अमित गोधनें विप्रां अर्पित, जय जय शब्दें ब्राम्हण गर्जत ॥ ४ ॥ बंदिजनादिक कीर्ति वाखाणित, अपार धन त्या उचिता देत ॥ ५ ॥ आनंदें गोंवळि साखर वाटित, परम हर्षे माधव पाहत ॥ ६ ॥

## ओवी.

नाद ऐकुनीं व्रजजनी। परमानंद दाटला मनी॥ पुत्र जाला नंदसदनी। अलंकारिति स्वगृहा॥ १॥ तव हर्ष भरें श्रीशंकर॥ कृष्ण दर्शन मनोहर॥ व्हावें म्हणुनी सत्वर। नंदसदना पातला॥ २॥

## पद-खट.

कोण गे बाई द्वारिं उभा। स्कंधिं त्रिणा शोभति शोभा॥ धृ०॥ भाळि विलसे शशि सुप्रभा। आला त्रिलोचन कोण्या लोभा॥ १॥ म्हणिती यशोदा इच्छित द्यावें। पुसति त्या गोपी प्रिय तें वदावें॥ २॥ धन कनक वस्त्रादिक हे नलगे। मी बाळाचें दर्शन मागे॥ ३॥ ऐकुनि यशोमति सुमति विचारी। नोहे कीं शंकर दावी मुरारी॥ ४॥ पाहुनि माधव शिव संतोषे। आशिर्वादा दे अति हर्षे॥ ५॥

## ओवी.

अद्भुत रूप भाळीं चंद्र। मस्तकीं जटाभार दाट सांद्र। त्रिलोचन सकळ देवेंद्र। साद्रचित्त दर्शनी॥ १॥ ऐसा यात्रिक आंगणी। पाहुनि गोपी चकित मनीं। यशोदे प्रति जाउनी। सांगत्या जाल्या॥ २॥ यशोदा म्हणे इच्छितार्थ। काय तो पुसावा इत्यर्थ॥ जो मागेल तो सिध्द अर्थ। मनोरथ पुरवावा॥ ३॥ गोपी इच्छितार्था

विचारिती । योगी म्हणे बालदर्शनाची प्रीती । यशोदा ऐकतांचि भारती । सत्वर दावी कृष्णातें ॥ ४ ॥ नमस्कारोनी श्रीशंकर । आशिर्वाद देउनी सुखकर । जाता जाला गिरिजावर । परम तोषें स्वस्थाना ॥ ५ ॥ तव देखिला वृध्द्र ब्राम्हण । यशोमति तात जन्मला करी स्तवन । यशोदे प्रति येऊन । गोपी जाल्या सांगत्या ॥ ६ ॥

## पद-राग-विभास.

कोण बाई हा कोण बाई । आगणि हा विप्र वृद्ध स्तुति करित अगाई ॥ धृ० ॥ जय जय अज परम ईश, स्वयंजोति स्वप्रकाश । अचल अमल पूर्ण ब्रम्ह, प्रगटसि हे नवाई ॥ १ ॥ नारायण मम जनक, विश्वालंकार कनक । स्तवन माझे श्रवण करूनी, जन्मसि फणिशाई ॥ २ ॥ गोप दारा ब्राम्हणासि, पाहुनि वदति यशोदेसि । दिव्य रूप कवण आहे, न पडेची ठाई ॥ ३ ॥ गर्ग वदत भूदेव, नसेल कीं ब्रम्हदेव । पाहु आला बाळकासि, त्या समीप नेई ॥ ४ ॥ देखुनिया माधवासि, हर्ष झाला कंजजासि । अष्टभाव युक्त होउनि, नमन करी पायीं ॥ ५ ॥

## ओवी.

गर्ग म्हणे असेल कीं विरंचि । ख्याती वर्णी जनकतेची । बाळ दाउनी तयाची । इच्छा पूर्ण करावी ॥ १ ॥ तेंचि काळीं मुनि नारद । येउनी स्तुति करी विषद । नमस्कारुनी आनंदकंद । कीर्तन करित चालला ॥ २ ॥

## पद-राग तोडी.

सत्कीर्तन करित धरित स्कंधिं विणा । रामकृष्ण गोविंद गदाधर हरिगुण कीर्तनी प्रेमभरित ॥ धृ० ॥ आला नारद सर्व विशारद, जटाभार शिरिं त्रिपुंड विलसत । त्रिभुवन चालक अद्भुत बालक, निज जनपालक चरण वंदित ॥ १ ॥ सत्यव्रत तू सत्यपरायण, सत्यात्मक तूं सत्य शाश्वत । स्तवुनी माधव जय जय यादव, अतर्क्य वैभव पाहुनि नाचत ॥ २ ॥

## ओवी.

शुक आणि सनत्कुमार । देवा सहित पुरंदर ॥ सिद्ध चारण विद्याधर । ऋषिवर्यासह पातले ॥ १ ॥

## पद-राग-जोगी.

सनकादिकां सहित शुक आला वो ॥ धृ० ॥ आला सहस्राक्ष कुबेर, वरुण धर्म वैश्वानर । समिर नैऋतु सुधाकर, आले कृष्ण दर्शना ॥ १ ॥ सिद्ध चारण विद्याधर, यक्ष गंधर्व किन्नर । देवांगना खग फणिवर, आले सर्व ऋषिवर्य ॥ २ ॥ देव करिती जैजैकार, म्हणति उतरला भूभार । विजय मूर्ति हा अवतार, माधव स्वयें प्रगटला ॥ ३ ॥

## ओवी.

करूनिया श्रीकृष्ण दर्शना । सकळही गेले आपुल्या सदना ॥ गोपाळ आल्हादुनी नंदभुवना । येते जाते संभ्रमें ॥ १ ॥

## पद-राग-रामकली.

चला चला नंदगृहा प्रति चला रे । यशोदे उदरीं पुत्र जन्मला, परम पुरुष पावला रे ॥ धृ० ॥ सकळ मिळुनि तुम्हीं दधि नवनित वट भरुनि घ्या पाहुं मुरारे । मंगळ द्रव्यें घेउनिया वाद्यें, गजर करु बहु भजारे ॥ १ ॥ नंदांगणि ते गोप येउनी, मिळवित दधि हळदिलारे । अंगि परस्पर चिन्हित करितां, वरदपाणि उमटलारे ॥ २ ॥ हर्षित अवनी मंगळ दावित, वासर अति शोभलारे । वैकुंठ केवळ गोकुळ भासत, माधव शिशु प्रगटलारे ॥ ३ ॥

## ओवी.

करुनि दधि हरिद्रा मिश्रित । गोप स्वानंदें सिंचित । अंगें जाली सुचिन्हित । परमानंदें डोलती ॥ १ ॥ ऐसा उत्सव करुनी पूर्ण । नंद करभार घेउन । कंसा लागीं निवेदुन । बाहेरि निघे ॥ २ ॥ मग वसुदेवातें भेटुनी । कुशल परस्परी पुसोनी । गुह्य तयातें अनुवादुनी । म्हणे जावें ॥ ३ ॥ जव नंद जाता मथुरेसीं । तव पूतना प्रवेशे

गोकुळासी । धरुनी मायिक वेषासी । सुंदरत्वें ॥ ४ ॥ यशोदा आणि रोहिणी । पाहुनी स्तब्ध जाल्या मनी । परि न कळे माइक करणी । स्तनीं विष ॥ ५ ॥ हातीं घेता नारायणा । जाणुनी तियेच्या छल चिन्हा । जागउनी कुंडली हृदयस्थाना । आणि वायूसी ॥ ६ ॥ कंठ नाळी येउनी वायुशक्तीं । लंबिका द्वारीं सिद्ध गति । दाटुनी टाळु मूळ रंध्र व्युक्ती । प्रवेशिले ॥ ७ ॥ इडा पिंगळा सुषुम्ना गति । नेउनी सहस्त्र दळा प्रति । सत्रावीचे क्षीर व्युक्ती । आणिले जिव्हे ॥ ८ ॥ ऐसा करुनी योग पूर्ण । जो जगदात्मा जगजीवन । तो पूतनेचे प्राण हरण । करीत युक्ती ॥ ९ ॥ अंकीं घेताचि श्रीकृष्णा । करी निज योग बंधना । वाम बाहु कंठस्थाना । करवळिलें कुचा ॥ १० ॥ वाम चरणें योनी पीडुनी । दक्षिण जानु उदरी पेलुनी । तियेची उर्ध्व शक्ति करुनी । आरोपी बंधा ॥ ११ ॥ पूतनें करिता बंधन । सहजीं शक्ति ऊर्ध्व होउन । तियेचे हृदयकमळीं पवन । येकवट जाला ॥ १२ ॥ मग मुखीं घेउनी स्तन । करी विषाचे शोषण । अमृत जिव्हे असता पूर्ण । न लागेचि मुखीं ॥ १३ ॥ मुख वायु वेगें करून । स्तन रंध्रीं विष प्रवेशुन । तियेचे हृदय पवनें जाण । ऊर्ध्व जाले ॥ १४ ॥ वायु विषा होता भेटी । विषाग्नि सहस्त्र दळा निकटीं । पावतां चंद्रकळा गोष्टी । आकर्षी श्रीकृष्ण ॥ १५ ॥ तव पंचप्राणा सहित । आकर्षितां श्रीकृष्णनाथ । राक्षसी होउनी पडली प्रेत, । प्रमाण ऐका ॥ १६ ॥ पूतना मरण पावता जाण । देह जाला सार्द्ध योजन । वृक्ष गृहातें मोडुन । पडलां क्षिती ॥ १७ ॥ आश्चर्य मानुनी सकळ । हस्त पाद

तोडिती गोवळ । काष्टे मेळउनी विपुळ । जाळिले तीर्ते ॥ १८ ॥
तत्र नंद येतां गोकुळासी । गोपाळा पुसता ख्याति ऐसी । सुगंध दाटला बहु दिसीं । सांगते जाले ॥ १९ ॥

## पद-न्हायाचे.

धन्य धन्य हे यशोदा देवी । आश्चर्य मानिले सुरवर देवी ॥ धृ० ॥
सर्व ब्रम्हांडाची करी उठाठेवी । तया पायावरी न्हाणाया ठेवी ॥ १ ॥
जो निज स्नेहें सकळां जिववी । त्या स्नेह लाउनी स्वकरें निववी ॥ २ ॥
अंडकटाह स्वचरणें भेदी । अघ हर गंगा आणि जो भेदी ॥ ३ ॥
तया नारायणा लौकिकपाणी । घेउनि क्षालित लाउनि पाणी ॥ ४ ॥
जया पासुनि प्रगटले अंबर । तया पुसितसे घेउन अंबर ॥ ५ ॥
शिव विधि इच्छिति चरणिची माती । त्याला लावी स्वपद माती ॥ ६ ॥
ज्याचा उपदेश विरंचि आकर्णि । जननी फुंकित त्याचे कर्णी ॥ ७ ॥
योगियाचें धन **माधव** निरंजन । त्याचे नेत्रीं माता घालित अंजन ॥ ८ ॥

## पाळणा.

जो जो जो जो रे निज बाळा, सुंदर तूं वननीळा । बाह्य वृत्ति तें गोपाळा, अंतरी लावी डोळा ॥ धृ० ॥ एकहि तुज वांचुनि मन करमेना । बहुतां खेळविसी, आपण तैसाची खेळसी ॥ काहीं ना तं

श्रमसी, इतरा श्रमविसी । परि ऐसी, स्वस्थ कां ना निजसी ॥ नित्य अचपळ तूं आहेसी । अखंड क्रीडसी ॥ १ ॥ ऐसी यशोदा वदतसे, कृष्ण मनीं हांसे । म्हणे उपदेश करीतसे, वर्म नेणे तैसे ॥ हें तव मज माजीं वसतसे । माझा मीचि असे ॥ **'माधव'** मीं अवघा विलसतसे, दुजे कांहीं नसे ॥ २ ॥ जो जो जो जो रे माधवा, सोडीं या लाघवा । किति खेळसी अवघा वेळ तूं माधवा ॥ वर्णी तव गुण सुकुमारा, स्वरूपिं नीज कुमारा । मजला लाजविलें लावण्यें, नेणे विधि सुकुमारा ॥ ३ ॥ प्रति युग अवतारी, श्रमलासी । सच्चित्सुख विलासी । साधू तव पद कमळासी, अविरत अभिलाषी । मन्मनि रमलासी, जन अवना पतित पावना । केलें पवित्र व्रजभुवना, करिती मुनि जन स्तवना ॥ ४ ॥ चिन्मय पाळणा विराजे, निजजग पाळणा । सुंदर गाताती, व्रजललना । तुज विण त्यांना कळेना । पुन्हा सत्वर जागावे, भक्ति सुख भोगावे ॥ साधुजनांनी यश गावें, चरित्र करावें । जडा पर पारीं उतरावे, **'माधवा'** तारावे ॥ ५ ॥

---

## ओंवी.

---

नंद अति त्वरें करुन । यशोदेते बोले वचन । बाळा कीजे निंबलोण । रामरक्षेसी ॥ १ ॥ कंसे पूतनेचिये वार्ते । ऐकुनि पाठवी शकटातें । शकट ठाके येउनी तेथें । निवेटी गाडा ॥ २ ॥ अवचटें यशोदा तेथें येउन । शकट सांडलिये निजवी कृष्ण । शकटें सांडावया

कारण । यत्न केला ॥ ४ ॥ प्रणवें कुंडली आकर्षुन । शक्ति दश दळीं स्थिराऊन । लत्ता प्रहारें शतचूर्ण । शकटासी करी ॥ ४ ॥ कंसें ऐकतां वर्तमान । पाठवी तृणावर्त कारणें । वायु रूपें धुरोळा घेऊन । गोकुळीं आला ॥ ५ ॥

---

## ओवी.

---

अच्छादुनी सकल नयना । कृष्ण लक्षुनी आंगणा । उडवुनि वेगें नेत गगना । माजि निरुतें ॥ १ ॥ कृष्णें ऊर्ध्व करुनि शक्ति । अनाहत चक्र मुनि विशुद्ध प्रति । आकर्षुनी पवनगति । प्राण आकर्षित ॥ २ ॥ ऐसें करितांचि बंधन । राक्षस पवनावरोधुन । कंठ मुरडोनिया श्रीकृष्ण । पाडिला शिळें ॥ ३ ॥ तव वसुदेव गर्गा पाचारुन । निज गुह्यातें निवेदुन । नंदगृहासी गुप्तपणें । जावे तुम्हीं ॥ ४ ॥ गर्ग येतां गोकुळासी । नंद अत्यादरें तयासी । म्हणे संस्कार कीज बाळासी । गुप्तमार्गें ॥ ५ ॥ गर्गें संस्कार करून । नाम ठेविलें रामकृष्ण । तयाचा निज प्रताप वर्णून । जाता जाला ॥ ६ ॥ तव रांगत रांगता । गृहांत बाहेर फिरता । यमुना तीरासी येतां । रामा सह ॥ ७ ॥ बाळां साहित जाउन । मृत्तिका भक्षी श्रीकृष्ण । राम यशोदेसी येऊन । सांगे वार्ता ॥ ८ ॥ यशोदा करुणें करुन । आली कृष्णा पासी धाउन । दधि दुग्ध आणि माखन । न मिळे तुज ॥ ९ ॥ म्हणे कां मृत्तिका भक्षितोसी । पुत्र हिता नेत्र

विकासी । निज गति मातृदृष्टीसी । नेत्रें केली ॥ १० ॥ या लागी मुख आवळून । निज दृष्टि मातेसी करुन । माता संशय मानुनी म्हणे । विकासी मुख ॥ ११ ॥ मुख विकासितांचि श्रीकृष्णें । यशोदा पाहे चतुर्दश भुवनें । तटस्थ होउनि आपण । आश्चर्य पाहे ॥ १२ ॥

## ओवी.

तव भुवन आतोती । चंद्र सूर्य नक्षत्र गति । चौदा इन्द्र पंक्ती । शचि सहित ॥ १ ॥ ब्रम्हा विष्णु महेश । अष्टा वसु रुद्र एकादश । द्वादश सूर्य अष्ट दिग्गीश । पाहती जाली ॥ २ ॥ गोकुळ मथुरा वृंदावन । नंदा सहित आपण । रोहिणी बळराम कृष्ण । गोपाळा सह ॥ ३ ॥ यमुना आणि गोवर्धन । पाहता म्हणे मज काय स्वप्न । की परब्रम्ह अवतार पूर्ण । जाला असे ॥ ४ ॥ तव कृष्णें जाणुनी मनी । अक्षयोग आकर्षुनी । रडों लागें बाळचिन्ही । मायापण ॥ ५ ॥ पुत्र मोहासी उपजविती । उचलुनिया दोन्ही हातीं । कडिये घेऊनी यशोमती । गेली गृहा ॥ ६ ॥ कृष्ण होता निद्रापन्न। यशोदा करी दधि मंथन । जागृत होउनी आपण । स्तन मागे ॥ ७ ॥ रवि दंड धरीं हाती । यशोदा धावे दुग्धा प्रति । गोपां मेळवुनी श्रीपति । दधि पात्र भंगिले ॥ ८ ॥ कोप आला यशोदे चित्तीं । पळतां धरूनिया हातीं । आणुनी उखळा प्रति बंधित केलें ॥ ९ ॥ उलूखल घेउनी रांगता । विमलार्जुना माजी रिघतां । तत्र त्यातें स्पर्श

होता । पडते जाले ॥ १० ॥ ते पडतांची तत्क्षणी । दिव्य देहातें पाउनी । दोंव करकमळ जोडुनी । स्तवितें जाले ॥ ११ ॥ जय जयाजी जगदुद्धारा । पूर्णब्रम्ह करुणाकरा । चरण स्पर्शें निजानुकारा । पावलो आम्हीं ॥ १२ ॥

---

## ओंवी.

---

ऐसी करुनी कृष्णस्तुति । स्वर्गा गेले शीघ्र गती । भक्तवत्सल श्रीपती । उध्दरिले भक्तां ॥ १ ॥ ऐसें चरणरजाचे महिमान । या लागीं शिवादि वांछिती जाण । हें सद्गुरुकपें करून । '**माधवीं**' प्राप्ति ॥ २ ॥

---

## श्लोक.

---

मत्स्याश्व कच्छप नृसिंह वराह हंस । राजन्य विप्र विबुधेषु कृतावतार ॥ त्वं पासि नस्त्रि भुवनंच यथाधुनंच । भारंभुवोहरयद्रुत्तम वंदनंते ॥ १ ॥

---

# गोपालकाला.

## पद.

नारायण हा अवतरला । स्तवितां श्रुति कुंटित जाला । अनंतानंत गुणनिधिला । शेष हि वर्णनि कीं थकला ॥ धृ० ॥ सुललित कांति वननीळ । मुकुटीं पिच्छें अति विमळ । सुंदर अलक मृदु कुटिळ । मृगमदें चर्चियले भाळ ॥ १ ॥ नासाग्रीं सम दृष्टि वरी । श्रवणीं कुंडलें साजिरी । श्रीमुख विधुची कांति हरी । अंगीं चंदन मलयागिरी ॥ २ ॥ वैजयंती वनमाळा । कासे पीतांबर पिंवळा । वेत्रक मुरली कवळा । स्कंधीं वाहुनि अवलीळा ॥ ३ ॥ अग्रज सह गो गोपाळ । मिळुनी मांडितसे खेळ । **'माधव'** नंदाचा बाळ । शुक भारती हे निर्मळ ॥४॥

## पद.

सच्चित्सुख पूर्णानंद गोविंदं ॥ धृ० ॥ वृंदारक मुनि वृंदानंदित वंदित विद्वज्जन श्रुतिवंद्यं ॥ १ ॥ सर्वशतक्रतु शार्विक्नस्तुति सर्वात्मक निष्कल निर्द्वंद्वं ॥ २ ॥ वंदेकंदममंदफलप्रद वृष्णिकुलोद्भव **'माधव'** माद्यं ॥ ३ ॥

## ओंव्या.

जे सच्चिदानंद पूर्णघन । अवतरोनियां ब्रह्मपर्ण । वृजीं स्वलीलें करून । क्रीडत असे ॥ १ ॥ सुतया प्रश्नाचिया भक्ती । अमूर्तचि आले व्यक्ति । तया रूपाचि दीप्ति युक्ती । काय वानू ॥ २ ॥ जो प्रणव बीज परि

पूर्ण । तोचि अवतरला श्रीकृष्ण । तयाचे त्वंपद हे चरण । सुचिन्ह युक्त ॥ ३ ॥ पंच मात्रा भिन्नाभिन्न । त्यांची आंगोळिया जाण । वरि नखें चंद्रकिरण । सुदीप्तीसी ॥४॥ ध्वज वज्रांकुश रेखा । वांकी तोडर गर्जती सोहं सुख । तये चरणींची सामुद्रिक रेखा । अखंड ध्वनि जे ॥५॥ उर्वरित तत्वभरित । जंघा जानु सुशोभित । उरुद्वयेसी संवेष्टित । पीतांबर कासे ॥ ६ ॥ नितंबावरि क्षुद्र घंटिका । कटि मेखळ जडलिया देखा । वेदगुह्यार्थ नेटका । पद्मज मुखें ॥ ७ ॥ मध्यमाना अतिशयेसी । पाहणे पहात निज दृष्टीसी । पंचाभिमान सिंह लज्जेसी । सहजचि जाये ॥८॥ जये नाभीचा पार । ब्रह्मा न पावे साचार । उत्पत्ति स्थिति लयाचा आधार । नाभी ऐसी ॥ ९ ॥ त्रिगुण तेचि त्रिवळी । बहिर्मुखें रोमावळी । जेथुनि प्रगटिजे सकळी । तेंचि हृदय ॥ १० ॥ त्यावरि पदकाचि ज्योतीचे । देखणे जे कां निज दृष्टीचे । मुक्ताहार येका वळीचे । गुणें विण गळां ॥ ११ ॥ वर्ते निज निज वनी स्वसुखें । नित्यानंदत्व ज्याचे नेटकें । तेंचि वनमाळा कौतुकें । अपादेसी ॥ १२ ॥ निज शांतिश्री लेपण । तेंचि वैजयंती जाण । ब्राह्मणाचा दक्षिण चरण । श्रीवत्छ ते ॥ १३ ॥ ॐकार मात्रा स्वयंभु । तोचि शोभे कंठ कंबु । जो वेदांत सुधांबु । तेथोनि प्रगटे ॥ १४ ॥ जया उपनिषदार्थ लाभ । होय तोचि कंठीं कौस्तुभ । चारी क्रिया सुशोभ्य । आजानुबाहु ॥ १५ ॥ जैसी कां पंचतत्वें । सलग्न येकैका संभवे । पंचांगुलिया क्रियास्वभावें । अधिष्ठानी ऐक्य ॥१६॥ स्वकरीं निज मुद्रिका सुचिन्हें । द्वैत सारुनी अभय देणें । परमपद पाविजे जेणें । पद्मकर तो ॥१७॥ शंख चक्र पद्म गदा । सुदर्शनादि पंचायुधें सदा । विराजित प्रणव पदा । चारी करी ॥ १८ ॥ प्रकृति पुरुष हे दोन्ही ।

कुंडलाकारें कृष्ण श्रवणीं । उपनिषदार्थ पूर्णकर्णी । मणिमय युक्त ॥ १९॥ जे स्थूलादि महाकारण। देखणे दृष्टीचे संपूर्ण । जें पूर्ण चैतन्यपण । उर्वरित असे ॥ २० ॥ गाळुनि तेथिचा आनंदु । तोचि कृष्णाचा वदनेंदु । परिपूर्णपणें स्वानंदु । स्वानंद सुख ॥ २१ ॥ जीव शिव हे दोन्ही । कृष्णमुखीं अधरपणीं । दंत पंक्ति सतेज कीरणीं । चिदानंदेसी ॥ २२ ॥ मोडुनि सकळ नास्तिक वाद । उंच वोनि प्रणव भेद । पवन हिंडतां सोहं स्वाद । नासिकीं पावे ॥ २३ ॥ पाहतां पाहणें नेत्रकमळें । निज दृष्टि अति विमळें । कीं चैतन्य वस्तु सफळ फळें । फळा आली ॥ २४ ॥ इंद्र धनुष्याची वोटी । तेचि भ्रूपल्लवे देहुडी ॥ सकळ तेजाची प्रौढी । कपोल स्थानीं ॥ २५ ॥ सच्चिदानंदें त्रिवळी । तेथें सोहं वदन सुशीतळी । तोहि गाळुनि योग बळी । निजतिलक तो ॥ २६ ॥ पंचतत्वें सरळ । तेचि मस्तकीं केश कुरळ । उभयभागीं अळक सुनीळ । शोभा देती ॥ २७ ॥ जे इंदु भास्कराचे परी । स्वरूप लक्षणाची थोरी । तेचि जडित मुकुट वरी । श्रीशीर्षी शोभे ॥ २८ ॥ ऐसा सगुणमूर्ति नारायण । जयाचे ब्रह्मादिकां ध्यान । तो वृंदावनीं **'माधव'** पूर्ण । अवतरला ॥ २९ ॥

---

## श्लोक.

---

प्रभातसंचारगतासुगाव स्तद्रक्षणार्थं तनयं यशोदा ।
प्रबोधयत्पाणि तलेन मंदं गोविंद दामोदर माधवेती ॥ १ ॥

---

## पद—भूपाळी.

योग निद्रे पुरुषोत्तम हा निज इच्छें असतां । सद्भावादिक गोपां प्रभात जिज्ञासा होतां ॥ नंदालयिं ते प्रार्थिति विद्या यशोदामाता । ज्ञानार्कोदय जाला उठवी कृष्णा तें आतां ॥ १ ॥ अनुभव आत्मारामा उठवुनि भेटवी माये । आनंदवनीं विचरूं उत्तम लक्षुनिया ठावे ॥ धृ० ॥ उठिं उठिं बा गोपाळा निज जन शरण कृपाळा । कृतार्थ करि तूं दर्शन देउनि निज दासां सकळा ॥ नाना संबोधनें देतां श्रमली वेल्हाळा । भक्ती राधा आली म्हणतां उघडीं निज डोळा ॥ २ ॥ श्रुतिरूप गोधने नेईं निर्गुण कानना । स्मृति वच्छें गोपां सह घेउनि खेळे जगजीवना ॥ जननी वाक्यें तोषवि गोपां वच्छा गोधना । सच्चिद परमानंद '**माधव**' तो यादवराणा ॥ ३ ॥

---

## ओवी.

भक्ति प्रार्थिली माता । श्रीमूर्ति उठवि तत्वता । यशोदा प्रार्थना करितां । उठिला हरि ॥ १ ॥ माथां मुकुट रत्न जडित । वरि सुमनें वेष्टित । अत्यंत शोभिसी शोभा देत । मयूर पिच्छ ॥ २ ॥ भाळीं कस्तुरी तिलक । आननी शोभती कुटि लालक । हातीं वेणु वेताटि सम्यक । धरी हरि ॥ ३ ॥ काळी कांबळी स्कंधा वरि । कखें साजिरें मृगधरी । झाला नंदाचा खिलारी । गोधने हांकी ॥ ४ ॥ सवें बलराम गोपांसहित । अलंकारें सुशोभित । दोघे गोप वेषधारी अनंत । नंदन '**माधव**' नंदाचे ॥ ५ ॥

## पद-वेणुवादन.

गोपाळ कृष्ण वेणु वाजवी स्वानंदें । कल्पद्रुमा तळिं उभा त्रिभंगी देहुडी शोभा हर्षलि गोपवृंदें ॥ धृ० ॥ सुस्वरें साजिरी मुरली अधरिं धरी गात सप्तस्वरीं अनुपम । न चळे यमुना जळ अनिळ हा निश्चळ स्तब्ध पक्षीकुळ तया नादें ॥ १ ॥ ध्यानिं मुनिगण सचकित होउन ध्यान विसर्जुन तल्लिन जाले । स्त्रियां सह देव विमानीं हे सर्व मोहित हा शिव प्रेमानंदें ॥ २ ॥ सनक सनंदन नारदादि करुन गोपी गोपजन वेधली हे । वत्सेंसी गोधनें पाडसें हरिणें न वेती स्तन तृण स्वर मोदें ॥ ३ ॥ वृक्ष रोमांच जाले जीवजंतु आनंदले गंधर्व विसरले गानकळे । योगमायाधव मोहन 'माधव' लीला विग्रह भाव आत्मछंदें ॥ ४ ॥

## श्लोक.

वर्हापीडनटवरवपु: कर्णयो: कर्णिकारं । बिभ्रद्वास: कनककापिशं वैजयंतींच मालां ॥ रंध्रान्वेणो रधर सुधया पूरयन्गोपवृंदै । वृंदारण्यं स्वपदरमणं प्राविशद्गीत कीर्ति: ॥ १ ॥

## अभंग-वळतीचे.

तुम्हांकडे वळती आली । कृष्णें गोपाआज्ञा केली ॥ १ ॥ आपुलि आपुली गोधनें । वळा तुम्हीं निज खुणें ॥ २ ॥ नाना भक्ति

वळूं जाती । नकळे तया मुळिचीं युक्ती ॥ ३ ॥ स्मृति प्रज्ञा बुद्धि मेधा । धारणा हे धृति श्रद्धा ॥ ४ ॥ ऐशा गाई वळूं जाती । परी त्या तयां नावरती ॥ ५ ॥ ऐसे बहुत श्रमले । 'माधवासी' शरण आले ॥ ६ ॥

## पद-गाई वळवेनात.

हरि मज ते वळवेनारे ॥ धृ० ॥ कर्मपथीं बहु धाउनि श्रमलों पदिं पळवेनारे ॥ १ ॥ श्रवणा शब्दा पाठी धांवे ते मज....॥ २ त्वक् धेनू हे स्पर्शी लोळे ते मज....॥ ३ ॥ नेत्रा रूपा पाहुनि भुलवी ते मज....॥ ४ ॥ रसना स्वादीं लोलुप जाली ते मज....॥ ५ ॥ घ्राणी गंधीं स्वेच्छे क्रीडे ते मज....॥ ६ ॥ वाणी गौहे सैरा जल्पे ते मज....॥ ७ ॥ हाताळीं बहु दुष्कृति विचरे ते मज....॥ ८ ॥ चरणी हिंडे अविधि मार्गी ते मज....॥ ९ ॥ पायु अमंगळ विसर्जुनि वर्ते ते मज....॥ १० ॥ गुह्या विषयीं मोहुनि श्रमली ते मज....॥ ११ ॥ पैल मनेरी चंचळ भारी ते मज....॥ १२ ॥ कर्म काठि तम धोंगाडि घेउनी ते मज....॥ १३ ॥ ऐसि गोधनें तुजविण 'माधव' ते मज....॥ १४ ॥

## पद.

ऐसी व्रजबाळें करुणानिधिला, प्रार्थिति श्रीहरिला । गेलों गोधनाच्या वळतीला, बहु श्रम हा जाला ॥१॥ काम्य वनीं कर्म कंटक पाहीं,

रुतले या पायीं । त्रिविध परितापें तप्त देहीं, सुख लेश नाहीं ॥ २ ॥ करुणा ऐकुनि करुणामूर्ती, निज भक्तां प्रती । अभय वरदानें तो श्रीपती, आश्वासित प्रीती ॥ ३ ॥ प्रेमें देउनियां आलिंगन, करी कुरवाळन । तुमचीं गोधनें मी वळीन, वदे **'माधव'** वचन ॥ ४ ॥

---

## श्लोक.

---

प्रणव गुरुपदातें वंदुनी मानसानें । त्रिभुवन सम तेजा भावितां मानसानें ॥ अतिसविनय त्यातें प्रार्थना **माधवाची** । हरिगुण कथनीं दे संगती साधवाची ॥ १ ॥ सदय गुरुकृपेचा लेश होतां स्वभावें । नवविध भजनाला पावली वृत्ति भावें । यदुपति शिशुलीला जे शुका-चार्यवाची । प्रगटलि जगिं तेची भारती **माधवाची** ॥ २ ॥ नंदनंदन वदे व्रजनंदना । गोधनें चरति निर्भय कानना ॥ व्यर्थ काळ सहसा नव जावा । स्वात्मखेळ बरवा समजावा ॥ ३ ॥ अहं हा हमामा हुतू हा हुतूतू । विवादें तुम्हां हुंबलीचाच हेतू । देहे भोंवरा फीरवा कर्म जाळीं । मनें वावडी ऊडवा अंतराळीं ॥ ४ ॥ अजा बीजलीं सप्त आवर्गि गुंता । कृतार्थानुवादें टिरी वाजवीता । विटी सत्क्रिया कोलितां काम्यदंडें । अम्हांसी लपामत्त भेदें वितंडें ॥ ५ ॥ भुली भोंवडी टीपरी वाजवीतां । अशा गोटिया लक्षुनी डाव घेतां । भरूनी भरी पार चक्री भवाचे । डगे वाजवा छंद नाकस्वराचे ॥ ६ ॥ तरू प्रपंचीं तरि घ्या उड्या हो । अज्ञान डोहीं बहु ग्या बुड्या हो । गुणात्म चेंडू फाळि

मांडुनी हो । कुतर्क पाटीं बहु धांवतां हो ॥ ७ ॥ अज्ञत्वें तुम्हि ज्ञात ते रगडुनी झोंबीस येतां बरें । हारीं येउनि भार अश्व सम ते घेतां मुखीं तोबरे । ऐसे खेळ बहूत स्वेच्छ रमतां नेणूनियां वर्म तें । जेकां नित्य अखंड अद्वय असे नाहीं तुम्हां शर्म ते ॥ ८ ॥ खेळांत ज्या रमतसां तुम्हि अष्टधेच्या । तो इंद्रजाळ रचतो गति वासनेच्या ॥ सांडूनि हा भ्रम तुम्ही मम धीस द्या हो । जो स्वात्मखेळ मुळिंचा मनिं आकळा हो ॥ ९ ॥ अहं हा हमामा करा दूर भावें । रमा सोहमस्मी स्वरूपीं स्वभावें । हुतूतू असें द्वैत सोडोनि द्यावें । हुतूतू तुतू ऐक्य भावा करावें ॥ १० ॥ विवादात्मिका हुंबली हे त्यजावी । अधोर्ध्वध्वनीं हुंबली हे धरावी । तनू भोंवरा कर्मजाळीं त्यजावा । गुरूच्या पदीं तो मनें फीरवावा ॥ ११ ॥ मनें बावडी अंतराळीं नका हो । चिदाकाशिं ते उन्मनी कां न का हो । अजा वीजली सप्त आवर्ण टाका । अजत्वें तुम्ही सप्तभूमीसि जिंका ॥ १२ ॥ कृतार्थी नसोनी टिरी वाजवा कां । गुरू कीर्तनीं मांदळा वाजवा कां । विटी सत्क्रिया काम्यदंडें न कोला । अकाम्यें त्यजा श्रीपदीं ते विटीला ॥ १३ ॥ नका हो लपो मत्तभेदें अम्हांसी । लपा मीपणा त्यागुनी स्वात्मदेशीं ॥ भ्रमाचे मुलीं भोवडीं व्यर्थ घेतां । फिरा सद्गुरूचे पदीं कां न आतां ॥ १४ ॥ नका वाजऊ टीपरी भेदरूपी । अभेदें रमा सर्वदा स्वस्वरूपीं । अशा गोटिचें लक्ष टाकूनि द्यावें । निराशें गुरूपाद लक्षीं असावें ॥ १५ ॥ त्यजा हो त्यजा चक्र कीं हें भवाचें । भजा रे भजा मूळचक्रार्थ साचें । नका वाजऊ शब्द नाकस्वराचे । सुखें वाजवा ब्रम्ह सामस्वराचे ॥ १६ ॥ प्रपंच

तरुच्या उड्या त्यजुनिया तुम्हीं वांकुड्या ॥ किं ऊर्ध्व मुक्तिच्या हुड्या वरि चढोनि खेळों गड्या ॥ बहूत तुम्हि अज्ञता हृदिं न घ्या किं हो ह्यां बुड्या । चिदांबुधि तरा धरा गुरुमुखोक्तिच्या सांगड्या ॥ १७ ॥ त्रिगुणमय कुचेंडू खेळणी टाकि छंदू । परि तुंतुरिय बिंदू सच्चिदानंदकंदू । त्यजुनि कुमति तर्का व्यर्थ धाऊं नकोरे । धरुनि सुमति पंथा स्वात्म-प'टी वसारे ॥ १८ ॥ अज्ञत्वें तुम्हि ज्ञात ते रगडुनी झोंबीस येऊं नका । विज्ञानें रगडूनि अज्ञपण हे झोंबी द्वया साथिंका । मिथ्या खेळ पशुत्व भार धरुनी घेऊं नका तोबरे । बैसा स्वात्मविचार सार तुरगीं डावासि जिंका बरें ॥ १९ ॥ गुरुत्वें वदे तो वृजीं बाळकासी । तिहीं मानिलें वाक्य भावें हिनासीं । स्वयें खेळवी सत्य संकल्प ज्याचा । असा खेळ मायाधवा **'माधवाचा'** ॥ २० ॥

---

## पद

---

अहं हा हमामा करा दूर भावें । रमा सोहमस्मी स्वरूपीं भजावें ॥ध्रु०॥ वालित असतां हमामा अहं ममतेचा । वाद बुद्धि कोंपर गाजवि साचा ॥ वळुनि मुष्टि संभ्रम हा तांड रणाचा । उठतां बसतां व्यर्थचि भ्रंश-मतिचा ॥ १ ॥ ऐसें असतां कृतकृत्य जालों पाही । हरि गुरु राणा भेटला धरिलें बाहीं ॥ धृ० ॥ वदले स्नेहें हमामा ऐसा घालीं । सोह-मस्मि बोधविला येकें बोलीं ॥ ऐक्य मुष्टि सच्चिदानंदीं वळली । उठतां बसतां **माधवें** कक्षा चढली ॥ जालो विजयी स्वप्रकाश निरहंकारें । सहजा लीळें ब्रह्मास्मि या विचारें ॥ २ ॥

## अभंग.

हुतूतूं असे द्वैत सोडोनि द्यावें । हुतूतूं तुतूं ऐक्य भावें करावें ॥धृ०॥

हुतु ऐशा द्वैतें, हुतुतूं घालीसी । डाई सांपडसी, ऐसा खेळें ॥ १ ॥

ज्ञानअज्ञानाची, मांडलीसे फळी । सिवे तोची बळी, आत्म हाले ॥ २ ॥

शमदमादीक, गडी हे ज्ञानाचे । तैसे अज्ञानाचे, कामादीक ॥ ३ ॥

काम क्रोधादीक, हुतुतूं घालीती । डाव नेव पहाती, द्वैत बळें ॥ ४ ॥

शम दम सर्व, गडी हे ज्ञानाचे । हुतूं निरासाचे, बोध बळीं ॥ ५ ॥

अखंड धारणें, निढावले पुढां । द्वैताचा रगडा, केला तींहीं ॥ ६ ॥

'**माधवें**' प्रेरीतां सिवतले हाते । ऐसें विजयी जाले, निजानंदीं ॥ ७ ॥

---

## अभंग.

विवादात्मिका हुंबळी हे त्यजावी । अधोर्ध्वनी हुंबळी हे धरावी ॥ धृ० ॥ मत्त अनुवादें, घालीसी हुंबळी । हे तो नोहे भली, स्वहितासी ॥ १ ॥ अहंकारें व्यर्थ, पोरा तू फुंदसी । आपणा नोळखसी, कोण मी हें ॥ २ ॥ जरि तुज कांहीं, कल्याणाची चाड. । श्रीगुरूचे कवाड, सेवीं सदा ॥ ३ ॥ वरद करें तुज, बोधिसी हुंबळी । सोहं सोहं बोली, दावीतीरे ॥ ४ ॥ तेणे छंदे खेळें, जनी वनी गड्या । पावसी रोकड्या, आनंदासी ॥ ५ ॥ सिकवीला खेळ, '**माधवें**' गोसांवी । ते ही या खेळासी, प्राप्त जाले ॥ ६ ॥

---

## अभंग.

देह हा भोंवरा, मायेच्या रंगणीं। विश्वादि गोपजनीं, मांडिला खेळ ॥ १ ॥ प्रतिस्पर्धी काळ खेळतसे देखा। आधि व्याधि दुःखा मारीत चुंबे ॥ २ ॥ जिऊबाजी तुम्हीं सोहंसूत्र जाळीं। लवक्षण पळीं सावधानें ॥ ३ ॥ घेउनी घेटाळा काळाचा भोंवरा। झेला तुम्ही बरा स्वात्मछंदें ॥ ४ ॥ जिका ऐसा डाव पावा अजरामरा भाव। आणिक ऐक्याभावा युक्तिचा तो ॥ ५ ॥ प्रणव हे आरी स्थिरावी आधारी। गुंजारव सहस्त्रारी स्वानंदाचा ॥ ६ ॥ सच्चिदानंद भोंवरा करतलामलक। 'माधव' निष्कलंक खेळवी ऐसा ॥ ७ ॥

---

## पद.

मनं वावडी अंतराळीं नका हो। चिदाकाशिं ते उन्मनें कां नका हो ॥ सखे हो वावडी उडवुं चला ॥ धृ० ॥ स्वेत रक्त पीत नीळ दीप्ति। तीचि वावडी घनची ज्योती ॥ १ ॥ नाडीत्रय हे बंधन युक्ति। सोहं सूत्रें धारण शक्ति ॥ २ ॥ पूरक रेचक वोढी सोडी। स्थिर करा हे कुंभक नाडी ॥ ३ ॥ अनहत चंगें मंजुळ गाजे। चिद्गगनीं अखंड विराजे ॥ ४ ॥ ब्रम्ह पुच्छ हें सहजाचि लीळे। 'माधव' गोपाळां-सह खेळे ॥ ५ ॥

---

## पद.

अजा वीजळी सप्त आवर्ण टाका। अजत्वें तुम्हां सप्तभूमींसि जिंका ॥ अजा वीजली सप्त आवर्णेसी। जीवत्वें गंतवी सखया।

यालागिं सावध होउनिया खेळें स्वात्मभावीं सखया ॥ १ ॥ मुळिंचा तूं शिव नाहिंस कीं जीव अजत्व ओळखें सखया । ऐक्य पदें सप्तभूमि आक्रमुनी पूर्ण खेळे सखया ॥ २ ॥ मुळींचिया वरा पावे अनुभवें ऐशा निजयुक्ति सखया । ‘ माधवें ’ कृपें बोधितां त्रि क्षणिं जीवन्मुक्ति सखया ॥ ३ ॥

## अभंग.

कृतार्थी नसोनी टिरी वाजवा कां । गुरूकीर्तनीं मांदळा वाजवा कां ॥ध्रु०॥ कृतार्थ नसोनी टिरी वाजवितां । हे तों माझ्या चित्ता नये कदा ॥ १ ॥ श्रीगुरूकीर्तनीं धरुनी सद्भावा । मांदळ वाजवा टाळ वोषें ॥ २ ॥ कीर्तन समाधि स्वात्मसुखीं खेळा । माधव गोपाळां, बोधितसे ॥ ३ ॥

## पद

